कृषीवल
रायगड, मंगळवार, दि. ४ नोव्हेंबर २०२५
किंमत ४ ₹

## मुंबई विमानतळाची धावपट्टी बंद


**मुंबई :** मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील प्रवाशांना २० नोव्हेंबर रोजी त्यांच्या प्रवासाच्या योजना तपासण्याचा सल्ला देण्यात आला आहे. कारण विमानतळ त्यांच्या दोन्ही धावपट्ट्या सहा तासांसाठी बंद ठेवणार आहे, असे विमानतळ संचालक मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडने म्हटले आहे. एमआयएएलने जारी केलेल्या निवेदनानुसार, विमानतळावरील दोन्ही धावपट्ट्या आरडब्ल्यूवाय ०९/२७ आणि आरडब्ल्यूवाय १४/३२ गुरूवारी (दि.२०) सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत ऑपरेशनसाठी अनुपलब्ध असतील.

निसर्ग हॉलिडेज्, अलिबाग
थायलँड पटाया १६/११/२५, २६/११/२५, ३०/११/२५ ४ स्टार हॉटेल ४ रात्र/पाच दिवस विजा फ्री ₹45000/-
दिल्ली, आग्रा, अमृतसर, वैष्णोदेवी १८/१२/२५, २३/१/२०२६ वन साईट ट्रेन/ वन साईट प्लेन थ्री स्टार हॉटेल, ८ रात्र/९ दिवस ₹19999/-
केरळ, कोचीन, मुन्नार, टेकडी, वडकला, देवेंद्र, कन्याकुमारी २२/१/२६ दोन्ही साईट थ्री टाकर ट्रेन एसी/थ्री स्टार हॉटेल ८ रात्र/९ दिवस ₹17999/-
बेंगलोर, म्हैसूर, उटी, कुन्नूर १/१२/२०२५ दोन्ही साईट थ्री टायर ट्रेन थ्री स्टार हॉटेल ६ रात्र/ ७ दिवस ₹13500/-
प्रभाकर पटेल : ९८८०२४१६६९
चंद्रकांत म्हात्रे : ९२६०७४५३२६/ अभिनव ठोंबर : ७७२१९२७४०४

# अलिबाग-रोहा मार्गावरील साकव कोसळला

### बांधकाम विभागाच्या निष्क्रियतेचा फटका

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी । अलिबाग-रोहा मार्गावरील खड्डेमय रस्त्यांचा प्रश्न असताना, वढाव येथील पूल (साकव) सोमवारी (दि.३) सायंकाळी कोसळला. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. मात्र, दुचाकीवरील एका महिलेसह दोघाजणांना किरकोळ दुखापत झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या दुर्घटनेनंतर पुन्हा एकदा रस्त्यांवरील पुलाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. घटना घडून कित्येक तास उलटूनही शासकीय यंत्रणा घटनास्थळी पोहोचली नसल्याने संताप व्यक्त करण्यात आला. या घटनेने सार्वजनिक बांधकाम विभागाचा बेफिकीर आणि निष्क्रिय कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.**





अलिबाग-रोहा मार्ग वर्दळीचा असून, या रस्त्यावरुन कायमच लहान-मोठी वाहने दिवस-रात्र सुरू असतात. या रस्त्यासाठी २०१९ मध्ये निविदा मंजूर करण्यात आली असून, १७७ कोटी रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला होता. मोठा गाजावाजा करीत शुभारंभासाठी नारळफोडी केल्याचे जगजाहीर आहे. प्रत्यक्षात मात्र या रस्त्याचे काम सुरूच झाले नाही. काँक्रिटीकरण, डांबरीकरण आणि रुंदीकरण करून रस्ता होणार होता. त्यात नवीन पूल बांधण्याचे काम होते. मात्र, या मार्गावरील प्रवाशांची घोर निराशा झाली. अलिबाग ते खानावपर्यंत डांबरीकरण तसेच खानाव ते गेल कंपनीपर्यंत काँक्रिटीकरण केले. अद्यापही या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. काँक्रिटीकरण अपूर्ण स्थितीत आहे. पान ५ वर

### ठेकेदारावर गुन्हा दाखल करा

आशिष नामक एका कंपनीला रस्त्याचे काम दिले आहे. रस्त्याच्या कामावर करोडो रुपये खर्च करण्यात आले. मात्र, या मार्गावरील पुलांच्या दुरुस्तीसह नूतनीकरणाकडे दुर्लक्ष करण्यात आले. निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडली असून, ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

> **बामणगाव-खानावमधील पूल कोसळला. मात्र, कोणतीही शासकीय यंत्रणा वेळेवर पोहोचली नाही. तातडीने पुलाचे काम करण्यात यावे, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल.**
> **- अमित म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते**

> **वढावनजीक पूल कोसळल्याची माहिती समजली. त्यानंतर तात्काळ अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाठविले आहे.**
> **- मोनिका धायतडक, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग**

### निवडणुकीच्या तारखा

# ५ नोव्हेंबरला होणार जाहीर ?

### दिलीप वळसे पाटील यांनी केला गौप्यस्फोट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीची चर्चा आहे. अनेक राजकीय पक्षांनी यासाठी तयारी सुरू केली आहे. न्यायालयाने ३१ जानेवारीपर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, अजून निवडणूकीचे वेळापत्रक जाहीर झालेले नाही. अशातच आता महायुतीचे दिग्गज नेते दिलीप वळसे पाटील यांनी निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत.

सध्या राज्यातील सर्वच पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या तयारीत व्यस्त आहेत. अशातच आता माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील यांनी नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महानगरपालिका निवडणुकीच्या संभाव्य तारखा जाहीर केल्या आहेत. त्यांनी म्हटले की, मी तारीख जाहीर करत नाही, तो अधिकार निवडणूक आयोगाचा आहे. परंतु, आमच्याकडील माहितीनुसार ५ नोव्हेंबरला नगरपालिका, नगरपंचायत निवडणूक जाहीर होतील. तर, १५ डिसेंबरला जिल्हा परिषद, पंचायत समिती मतदान होईल. तसेच, जिल्हा परिषदेच्या निवडणूका सुरु असताना महानगरपालिकांच्या निवडणूका जाहीर होऊन १५ जानेवारीला मतदान होईल आणि ३१ जानेवारीला सर्व निवडणुका पूर्ण होतील. मंचर येथे युवक-युवती मेळाव्यात बोलताना वळसे पाटलांनी ही माहिती दिली आहे.

## आत्महत्येला परावृत्त केल्याप्रकरणी गुन्हा

**नवीन पनवेल :** नावडे येथील वैशाली पवार (२१) या महिलेने आत्महत्या केल्याप्रकरणी सहा जणांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वैशाली राठोड हिचा विवाह २०२३ मध्ये बुलढाणा येथील उमेश पवार यांच्यासोबत झाला. ते नावडे गाव येथे भाड्याने राहात होते. वैशालीचे पती उमेश पवार, सासू अरुणा पवार, सासरे रमेश पवार, नणंद सोनू राठोड, नेहा राठोड आणि पती कृष्णा राठोड या सर्वांनी मिळून तिला कार घेण्यासाठी माहेरून १ लाख रुपये आणण्यास सांगितले. तसेच, तिचा शारीरिक व मानसिक छळ करून तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले.



● भारतीय महिला क्रिकेट संघाने रविवारी (दि.२) नवी मुंबईतील डी.वाय. पाटील स्टेडियमवर इतिहास घडवला. महिला विश्वचषक २०२५च्या अंतिम सामन्यात दक्षिण अफ्रिकेला नमवून पहिल्यांदाच विश्वचषकावर नाव कोरले. (सविस्तर वृत्त पान ८ वर)

## आमदार, खासदारांची शेतकऱ्यांकडे पाठ

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यासह कोकणात झालेल्या अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील शेतकरी व बागायतदारांचे अपरिमित असे नुकसान झाले आहे. सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये झालेल्या वादळवारा व पावसाने भातपीक पूर्णपणे जमीनदोस्त झाले आहे. त्यामुळे हातातोंडाशी आलेला घास अतिवृष्टीने हिरावून घेतल्याने शेतकरी पूरता उद्ध्वस्त झाला आहे. त्याहून वेदनादायक म्हणजे, संबंधित अधिकाऱ्यांसह खासदार, आमदार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर फिरकलेदेखील नाहीत. त्यामुळे ज्यांना निवडून दिले त्यांनीच आपल्याकडे पाठ फिरवल्यामुळे शेतकरी बांधवांमधून प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.



मे महिन्यापासून सुरूवात केलेल्या पावसाने अद्याप विश्रांती घेतलेली नाही. नोव्हेंबर महिन्याला सुरूवात झाली तरी पावसाची रिपरिप सुरूच आहे. या अतिवृष्टीने रायगड जिल्ह्यासह शिहू-बेणसे विभागात कापणीला आलेले पीक शेतातील चिखलात रुतले असून, काही प्रमाणात कुजलेदेखील आहे. तसेच, काही ठिकाणी त्या धानाला कोंब आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकरी पुरता उद्ध्वस्त झाला आहे. सोन्यासारख्या पिकाची माती झालेली पाहून शेतकरी हांबरडा फोडून रडत आहेत. त्याहून वेदनादायी म्हणजे शिहू विभागासह इतरत्र भातपिकाचे नुकसान झालेल्या शेताच्या बांधावर आजवर कुणी प्रशासकीय अधिकारी तसेच निवडणुकीवेळी दारोदारी फिरणारे, शेतकऱ्यांच्या मतांवर निवडून आलेले आमदार-खासदारदेखील फिरकले नाहीत. त्यामुळे येथील शेतकरी विश्वनाथ गदमळे यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. पान ५ वर

## कुत्रा आडवा आल्याने अपघात

**पनवेल :** कुशल सोनकर आपला चुलत भाऊ मितेश ढवळे व इतर मित्रांसह लोणावळा येथे दुचाकीवर फिरायला जात होते. ते जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील बारवईजवळ आले असता, कुशल सोनकर याच्या ताब्यातील भरधाव दुचाकीसमोर अचानक एक कुत्रा आडवा आला. त्या कुत्र्याला वाचविण्यासाठी कुशलने अर्जंट ब्रेक दाबला. त्यामुळे त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि ती रस्त्यावर घसरली. यादरम्यान, कुशल सोनकर रस्त्यावर पडून त्याला गंभीर दुखापत झाली आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## आवासच्या यात्रेसाठी एसटी सज्ज

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

धार्मिक क्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या अलिबाग तालुक्यातील आवासच्या यात्रेला लाखो भक्त दर्शनासाठी जातात. यंदा ही यात्रा मंगळवारी (दि.४) भरणार आहे. येथील नागेश्वराच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांची गैरसोय होऊ नये, म्हणून अलिबाग एसटी बस आगारातून १० ज्यादा बसेसचे नियोजन केले आहे. यात्रेसाठी एसटी सज्ज असल्याची माहिती आगार व्यवस्थापक राकेश देवरे यांनी दिली.



अलिबाग तालुक्यातील आवास येथील नागेश्वरची यात्रेची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून जपली आहे. यंदा मंगळवारी आवासमधील नागेश्वराची यात्रा आहे. सोमवारी मध्यरात्रीपासून दर्शनासाठी भक्तांची गर्दी असणार आहे. या यात्रेसाठी ग्रामीण भागातील भाविक बैलगाड्या घेऊन दर्शनासाठी येत असतात. वर्षानुवर्षांपासून चालत आलेली ही परंपरा जपण्याचे काम बैलगाडी हौशी मंडळींनी आजतागायत केली आहे. यात्रेसाठी दर्शनासाठी जाणाऱ्या इतर भक्तांसाठी अलिबाग एसटी बस आगारामार्फत एसटी बसची व्यवस्था केली आहे. यावेळी एकूण दहा ज्यादा बसेस मंगळवारी सकाळी आठ वाजल्यापासून सोडल्या जाणार आहेत. यात्रा संपेपर्यंत ही सेवा सुरु राहणार आहे. पेण व कर्जत आगारातूनही पान ५ वर

## सख्ख्या भावांनीच केला जन्मदात्यांचा खून

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यातील सुसंस्कृत आणि शांततेसाठी ओळखल्या जाणाऱ्या मेंदडीकोंड गावात रविवारी (दि.२) एक हृदयद्रावक घटना घडली. गावातील दोन सख्ख्या भावांनी स्वतःच्या जन्मदात्या आई-वडिलांचा गळा घोटून खून केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घटनेने संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून, परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



मेंदडीकोंड गावातील महादेव कांबळे (९५) आणि विठाबाई कांबळे (८३) यांचा मृतदेह रविवारी त्यांच्या राहत्या घरात आढळून आला. सुरुवातीला हा अकस्मात मृत्यू असल्याची नोंद म्हसळा पोलिसांनी केली होती. मात्र, सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे आणि उपनिरीक्षक सुनील कोहीणकर यांनी केलेल्या चतुरस्त्र तपासात संशय वाढला. त्यानंतर शिस्ते येथील त्यांची मुलगी अर्चना पाटील (४०) हिने दिलेल्या तक्रारीवरून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नरेश कांबळे (६२) व चंद्रकांत कांबळे (६०) अशी या दोन सख्ख्या भावांची नावे आहेत.

विशेष म्हणजे, म्हसळा पोलिसांनी केवळ १२ तासांत आरोपींना अटक करून तपास पूर्ण केला. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक पान ५ वर

## ज्येष्ठ अभिनेत्री दया डोंगरे यांचे निधन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ अभिनेत्री दया डोंगरे यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या निधनामुळे मराठी चित्रपटसृष्टीवर आणि कलाविश्वावर शोककळा पसरली आहे. त्यांनी आपल्या सशक्त अभिनयाच्या जोरावर मराठी रंगभूमी, चित्रपट आणि दूरचित्रवाणी मालिकांमध्ये एक खास स्थान निर्माण केले होते. विशेषतः दूरदर्शनवर गाजलेल्या 'गजरा' मालिकेमुळे त्या घराघरात पोहोचल्या आणि प्रचंड लोकप्रिय ठरल्या. त्या बऱ्याच दिवसांपासून आजारी होत्या. त्यांच्या निधनाने चाहत्यांनी शोक व्यक्त केला आहे. त्या ८५ वर्षांच्या होत्या. दया डोंगरे यांनी त्यांच्या कारकीर्दीत अनेक गाजलेल्या हिंदी आणि मराठी चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारल्या.




'खट्याळ सासू नाठाळ सून', 'नवरी मिळे नवऱ्याला', 'नकाब', 'लालची' आणि 'कुलदीपक' यांसारख्या चित्रपटांत त्यांचा अभिनय पाहायला मिळाला. त्याचप्रमाणे त्यांनी 'चार दिवस सासूचे' या लोकप्रिय मालिकेतही काम केले होते.

### हॉटेल व्यवसायिकांच्या व्यवसायावर परिणाम | बगीच्यामधील लग्नसभारंभ हॉलमध्ये

# पावसामुळे 'डेस्टिनेशन वेडिंग' संकटात

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

नोव्हेंबर महिन्याची सुरुवात होऊनही पावसाची रिपरिप कायम आहे. त्यामुळे याचा परिणाम लग्नसमारंभावर होत आहे. रिसॉर्टच्या लॉनवर किंवा उघड्यावर आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम आता बंदिस्त सभागृहांमध्ये आयोजित करण्याची नामुष्की आयोजकांवर येत आहे. त्याचा परिणाम हॉटेल व्यावसयिकांच्या व्यवसायावर होत आहे. त्यांना मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागत असल्याची माहिती एस.आर. रिसॉर्टचे मालक ओमकार शेवाळे यांनी दिली आहे.



### बंदिस्त सभागृहांना मागणी

तुळशीच्या लग्नानंतर लग्नसराईला मोठ्या प्रमाणात सुरुवात होणार आहे. परिणामी, मुलाचे किंवा मुलीचे लग्न घराच्या दारातच करण्याचे स्वप्न अनेक पालक उराशी बाळगून असतात. पाऊस सुरूच राहिल्यास नाईलाजाने लग्नसमारंभ बंदिस्त सभागृहात आयोजित करण्याची वेळ अशा वधू-वरांच्या नातेवाईकांवर येणार आहे. त्यामुळे बंदिस्त सभागृहांना मागणी वाढण्याची शक्यता आहे.

> **मुलीचा साखरपुडा समारंभ सर्व नातेवाईकांच्या उपस्थितीत घराच्या दरातच व्हावा याकरिता नियोजन केले होते. पावसामुळे मंडप व्यावसायिकाने नुकसान होण्याच्या भीतीने मंडप उभारण्यास नकार दिल्याने नाईलाजाने मोजक्याच नातेवाईकांच्या उपस्थितीत साखरपुडा उरकावा लागला आहे.**
> **- हेमंत जगताप, वधूपिता**

मे महिन्यापासून सुरु झालेला पाऊस अद्यापही थांबायचे नाव घेत नसल्याने राज्यातील शेतकरी अडचणीत आला आहे. शेतकऱ्यांसोबत हंगामी स्वरूपाचे व्यवसाय करणाऱ्या व्यावसयिकांचादेखील त्यात समावेश आहे. दिवाळीनंतर येणाऱ्या तुळशी विवाहानंतर लग्न सराईला सुरुवात होते. अनेकजण आपले लग्न सभारंभ मोकळ्या जागेत, रिसॉर्टच्या लॉनवर अथवा उद्यानात करण्याला पसंती देत असतात. याचा फायदा लग्न समारंभाचे व्यवस्थापन करणाऱ्या व्यावसायिकांना होत असतो. मात्र, पावसाळा लांबल्याने बंदिस्त हॉलमध्ये लग्न करण्यास भाग पडत असल्याने 'डेस्टिनेशन वेडिंग' करू पाहणाऱ्यांच्या आनंदावरदेखील विरजण पडत आहे. तर, डेस्टिनेशन वेडिंगचे आयोजन करणाऱ्या आयोजकांनादेखील याचा फटका बसत आहे. पान ५ वर

## कालव्यात सापडला तरुणाचा मृतदेह

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्याजवळील सुकेळी येथील कालव्यात रविवारी (दि.२) चिकणी येथील प्रदीप गणपत देवरे (३८) याचा मृतदेह सापडला. याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.



नागोठणे पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुकेळी खिंडीच्या जवळ असणाऱ्या पुलाखालील कालव्यात एक तरूण पडल्याची माहिती नागोठणे पोलिसांना मिळाली. त्यानुसार प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी आपल्या पोलीस पथकासह घटनास्थळी दाखल झाले आणि पुलाखाली ९० फुट खोल असलेल्या कालव्यात ते उतरले. त्यानंतर मृतदेह क्रेनच्या सहाय्याने वर उचलून काढून नागोठणे प्राथमिक उपचार केंद्रात नेण्यात आला. मृताच्या खिशामध्ये सापडलेल्या पॉकेटमधील ओळखपत्रावरून मृतदेहाची तात्काळ ओळख पटली. प्रदीप देवरे याने नैराश्यातून पुलावरून उडी मारून आत्महत्या केल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात दिसून आले असून, पुढील तपास नागोठणे पोलीस करीत आहेत.

## मोहोपाड्यातील तरुणाची आत्महत्या

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

मोहोपाड्यातील पंचशीलनगर येथील गजानन धोंडीराम पतंगे (३६) या तरुणाने आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. गजानन पतंगे याने राहत्या घराच्या छताला असलेल्या लोखंडी पाईपला नायलॉनच्या दोरीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. गजानन पतंगे याने नैराश्यातून टोकाचे पाऊल उचलले असावे, असे प्राथमिक चौकशीतून समोर आले आहे. या घटनेचा अधिक तपास स्थानिक पोलीस करीत आहेत.

# नागेश्वर यात्रेवर पावसाचे सावट

**| सोगाव | प्रतिनिधी |**

कार्तिकी एकादशीला पंढरपूरच्या यात्रेसोबत रायगड जिल्ह्यातील खोपोली येथील साजगावची यात्रा सुरू होते. यानंतर अलिबाग तालुक्यातील आवास येथील नागेश्वरची भरते. प्राचीन काळापासून चालत आलेल्या या यात्रेला भाविकांची मोठी गर्दी असते. यात्रेला रायगड जिल्ह्यातीलच नव्हे तर परजिल्ह्यातील भाविकही मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात. या यात्रेची शेतकरी वर्ग मोठ्या आशेने वाट पाहत असतात. मात्र, यावर्षी परतीच्या पावसाने आपला मुक्काम वाढवला असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. या परतीच्या पावसाचा फटका नागेश्वर व कनकेश्वर येथील यात्रेला बसला असल्याने यात्रेत येणाऱ्या व्यावसायिक, लहान मोठे खेळणी व इतर तत्सम वस्तू विक्रेते, मिठाईचे दुकानदार, आकाश पाळणे, ब्रेकडान्स व इतर सर्व मनोरंजनांचे व्यवसायिक यांना



बसला असल्याचे दिसून येत आहे. यामुळे सर्व व्यावसायिक चिंतेत सापडले आहेत. यावर्षी आवास येथील नागेश्वरची यात्रा मंगळवारी (दि.४) होणार आहे. तर, मापगाव येथील कनकेश्वरची यात्रा दि. ५ व ६ नोव्हेंबर असे दोन दिवस होणार आहे.

# नागावमध्ये 'सैनिक सन्मान' कार्यक्रमाचे आयोजन

**अलिबाग :** सैनिकांची देशभक्ती, त्याग, कर्तव्य निष्ठा आणि पराक्रम याप्रती आदर व प्रेम व्यक्त करण्यासाठी अलिबाग तालुक्यातील नागाव हायस्कुल समोर बुधवारी (दि.५) सकाळी साडेनऊ वाजता 'सैनिक सन्मान' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात सैनिकांसह वीर पत्नी, वीरमाता व वीर पिता या सर्वांचा सन्मान करण्यात येणार आहे. त्यामुळे या सर्वांनी आवर्जुन उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक विद्या गोखले यांनी केले आहे. तसेच, सर्व देशप्रेमिंनी देखील या कार्यक्रमाला उपस्थित राहून सैनिकांचे अनुभव आणि त्यांच्याकडून देशप्रेमाच्या गाथा ऐकण्यासाठी उपस्थित राहण्याचे देखील आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# साजगाव यात्रेतील वृक्ष धोकादायक

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

खोपोली पेण मार्गावर साजगाव येथे प्रसिद्ध असलेली बोंबल्या विठोबाची जत्रा संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. संत श्रेष्ठ जगतगुरु तुकाराम महाराज यांच्या काळापासून सुरु असलेली खालापूर तालुक्यातील साजगाव येथे बोंबल्या विठोबाची जत्रा दरवर्षी कार्तिकी एकादशीला १५ दिवस भरत असते.यावेळी विविध प्रकारची दुकाने, उंच आकाश पाळणे, झोके, विविध प्रकारच्या खेळण्याची दुकाने असतात. त्याच दुकानाच्या आजू बाजूला व रस्त्यालगत तीन गुलमोहर जातीची तीन जीर्ण वृक्ष सुकलेल्या अवस्थेत असून सध्या पावसाचा काही नेम नसल्यामुळे हे वृक्ष पडून मोठी जीवितहानी होऊ शकते. याच पाश्वभुमीवर स्वराज्य पोलीस मित्र संघटनेने पूढाकार घेऊन वृक्षतोड करून जीवितहानी



टाळावी, यासाठी खोपोली नगर परिषद चे मुख्याधिकारी पंकज पाटील आणि खालापूर वनविभागाचे अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.


## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
उप प्रादेशिक कार्यालय रायगड-२

**शुध्दीपत्रक**

दैनिक कृषिवल या वृत्तपत्रात दि. ०३.११.२०२५ रोजी मे. मोवा डिस्टिलरिज प्रा. लि., स. क्र. ८/१, ८/२ आणि ८/५, गाव अंबिवली त. कोतल खलाटी, ता. कर्जत, जि. रायगड यांच्या प्रस्तावित ३ कि. लि./दिन महुवा फुलांवर आधारित मद्य निर्मिती आणि बॉटलिंग प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी दि. ०५.१२.२०२५ रोजी ठिक दुपारी १२.३० आयोजित केली असल्याची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

सदर जाहिरातीमध्ये अनु क्र. (२४) मध्ये ग्रामपंचायत निगडाळे, ता. खेड, जि. पुणे असे प्रसिद्ध झाले आहे त्याऐवजी ग्रामपंचायत भोरगिरी, ता. खेड, जि. पुणे असे वाचावे.

उर्वरित जाहिरातीमधील मजकूर आहे तसा वाचावा.

सही/-
उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)

ज.म.र अर्ज ३४२/२०२५

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्री. फरहाद अब्दुल कादिर कबले, — अर्जदार
रा. खारआंबोली पो. शिघ्रे,
ता. मुरुड, जि. रायगड
विरुद्ध
मुख्याधिकारी
नगर परिषद मुरूड, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. ०६/०५/१९७१ रोजी मौजे मुरूड, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आंबोली, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. ०६/०५/१९७१ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक १२/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीन आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म- मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.३/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

## मुरूड जंजिरा नगरपरिषद
लोकमान्य टिळक रस्ता, मुरुड जंजिरा, जि. रायगड, पिन कोड नं. ४०२४०१
दुरध्वनी क्रमांक ०२१४४-२७४०२२,
ई-मेल आयडी :-co.murudjanjira@gmail.com

जावक क्रमांक.१३८४/बांध/२०२५-२६, दिनांक :-०३/११/२०२५

**जाहीर प्रकटन**

ज्याअर्थी खराब रस्ते व रस्त्यांवरील खड्डे यांमुळे होणारे अपघात व मृत्यू याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. ७२/२०१३ ची सुनावणी दि. १३/१०/२०२५ रोजी संपन्न आली असून, सदर सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहेत. त्यानुसार नगरपरिषद क्षेत्रात रस्त्यांवरील खड्डयांबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी तत्तेम खड्डयांमुळे मृत्युमुखी अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समितीची स्थापना करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड हद्दीतील नगरपरिषद मालकीचे व अखत्यारीत रस्त्यावरील खड्ड्यांमुळे मृत्युमुखी पडलेल्या अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने जनहित याचिका क्र.७१/२०१३ च्या अनुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद | सदस्य |
| २ | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग | सदस्य |

तरी मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड हद्दीतील नगरपरिषद मालकीचे व अखत्यारीत रस्त्यावरील खड्ड्यांबाबत मुरुड नगरपरिषद कार्यालयात तसेच co.murudjanjira@gmail.com या ई-मेल आयडीवर तक्रार दाखल करता येईल.

सही/-
**मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)

ज.म.र अर्ज ३७९/२०२५

**जाहीर नोटीस**

प्रति,
मोअज्जम अहमद दाखवे — अर्जदार
वय ५८ वर्षे, धंदा-सेवानिवृत्त
रा. मु.पो. नांदगाव
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड
विरुद्ध
सरकारतर्फे मा. तहसिलदार सो.
तहसिल कार्यालय मुरूड,
ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव,
मा. ग्रामसेवक — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार मोअज्जम अहमद दाखवे यांचा जन्म दिनांक १०/०६/१९६६ रोजी मौजे नांदगाव, ता. मुरुड, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय नांदगाव व मा. तहसिलदार कार्यालय मुरूड यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार मोअज्जम अहमद दाखवे, यांचा दिनांक १०/०६/१९६६ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक २१/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीन आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म- मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)

ज.म.र अर्ज ३३०/२०२५

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्री. तुषार महादेव गायकर, — अर्जदार
रा. जोसरांजन, पो. शिघ्रे, ता. मुरुड, जि. रायगड
विरुद्ध
निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत आंबोली, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. २०/०२/१९९२ रोजी मौजे जोसरांजन, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आंबोली, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. २०/०२/१९९२ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक १२/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीन आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म- मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.३/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे पाषाणे, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकतः -**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| मनिषा चतुर्थदास साळुंखे | १४ | ८/क/२ | ०-२०-०० | ० | ०९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ०४/११/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेलः adv.jayeshmhase@gmail.com

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नागांव ता. अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.मंगेश चंद्रकांत चव्हाण रा.शिवम सदन विर सावरकर मार्ग प्रभादेवी मुंबई -४०० ०२५ यांच्या नांवे असलेली खुद्द मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे स्नेही यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.,) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागांव ता.अलिबाग जि.रायगड | १७१५ | ०-१५-२० पो.ख ०-०१-५० एकुण क्षेत्र ०-१६-७० | ३.३० |
| वर नमुद मिळकतीपैकी ०-०६-०० हे. आर., मिळकत | | | |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- ०३/११/२०२५

सही /-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता:श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालया समोर गाळा क्र.३, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)

ज.म.र अर्ज ३७३/२०२५

**जाहीर नोटीस**

प्रति,
तकीउल्लाह नसीर उलडे — अर्जदार
रा. मु.पो. विहूर
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड
विरुद्ध
मुख्याधिकारी सो.
नगरपरिषद मुरूड, — सामनेवाला
ता. मुरुड, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार तकीउल्लाह नसीर उलडे, यांचा जन्म दिनांक १२/०६/१९७३ रोजी मौजे मुरूड, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद नगरपरिषद मुरूड कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार तकीउल्लाह नसीर उलडे, यांचा दिनांक १२/०६/१९७३ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दि. २१/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीन आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म- मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)

ज.म.र अर्ज ३७२/२०२५

**जाहीर नोटीस**

प्रति,
शाहीन तकीउल्लाह उलडे
लग्नापूर्वीचे नाव शाहीन खालिद ददनाक — अर्जदार
रा. मु.पो. विहूर
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड
विरुद्ध
मुख्याधिकारी सो.
नगरपरिषद मुरूड, — सामनेवाला
ता. मुरुड, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार शाहीन खालिद ददनाक उलडे, लग्नापूर्वीचे नाव शाहीन खालिद ददनाक यांचा जन्म दिनांक १२/०६/१९७३ रोजी मौजे मुरूड, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद नगरपरिषद मुरूड कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार तकीउल्लाह नसीर उलडे, यांचा दिनांक ०१/०८/१९७८ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दि. २१/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीन आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म- मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

## जाहिर नोटीस

सर्व संबंधितांस याद्वारे कळविण्यात येते की, आम्ही हेमंत बाळकृष्ण धनावडे, राहणार-दिवेआगर, ता. श्रीवर्धन, जि. रायगड मंगेश बाळकृष्ण धनावडे, सुजाता सुनिल जोगळे (लग्नापुर्वीचे नाव नंदिनी बाळकृष्ण धनावडे) व गीता गणेश निर्मळ (लग्नापुर्वीचे नाव वंदना बाळकृष्ण धनावडे) सर्व यांचे गाव-कार्ले, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील गट क्र. ११७, एकुण क्षेत्र १-०६-०० आर्स या जमिन मिळकतीत सिताराम येसु रसाळ व त्यांची प्रथम पत्नी गंगाई सिताराम रसाळ यांची मुलगी गंगाबाई बाळकृष्ण धनावडे (विवाहापुर्वीचे नाव ताराबाई सिताराम रसाळ) यांची मुले म्हणुन वारस हक्क असुन ह्या मिळकतीबाबत कोणीही अन्य कोणाशीही कोणतीही खरेदी-विक्री व्यवहार करु नये, व तसा कोणताही व्यवहार झाल्यास तो माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.

श्रीवर्धन,
दिनांक :-२९/१०/२०२५

हेमंत बा. धनावडे
(हेमंत बाळकृष्ण धनावडे)

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीन मिळकत संदर्भित जमीनमिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. गजानन रामचंद्र राऊत, २. श्रीमती गीता अशोक म्हात्रे, ३. श्रीमती रेखा गौरीशंकर राऊत, ४. श्रीमती. चेतना चंद्रकांत माने, ५. श्रीमती. दिपाली दिलीप काठे, ६. श्रीमती. संगीता उदेश घरत, ७. श्री. गणेश बळवंत राऊत व ८. श्रीमती. योगिता बळवंत राऊत, यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीन मिळकतीचे परिशिष्ट :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड. | ७५ | ०-७४-२० | २.६२ |

अलिबाग,
दिनांक ०४/११/२०२५.

**राजेंद्र दा. पाटील**
ॲडव्होकेट
कृष्णवंदन - २, ब्राम्हणआळी, कन्याशाळेसमोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड,
मो. ९८२२५२८९३१
ईमेल- adv.rdpatil@gmail.com

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस हया जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे खारशेत ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट क्र. ९५, एकूण क्षेत्र ०-६४ - ४० आकारणी ८.६९ लागवड भात व मोजे खारशेत ता. श्रीवर्धन जि. रायगड येथील गट क्र. ९२ एकूण क्षेत्र ०-०० - ४० आकारणी ०.०५ लागवड चालू पड, इतक्या क्षेत्राची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्रीम. चांदा अ. हक्क बोंडारे, श्री. शब्बीर हुसेन मुर्तुजा, श्री. शराफत हुसेन मुर्तुजा, श्रीम. सुरय्या अ. रशिद चोगले श्रीम. शैनाज मुस्ताक साठविलकर, श्री. मुस्तकीम खलील मुर्तुजा, श्रीम. परविन खलील मुर्तुजा, श्रीम. सफीया खलील मुर्तुजा, श्री. महमद अस्लम अ अजीज बरडे, इमतीआज महमद अ. अजीज बरडे, सर्व रा. मु. गोंडघर, ता. म्हसळा, जि. रायगड यांच्याकडून जाण्या- येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकांन सोबत केलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबेकब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल नाही. वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा, पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत ( समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाराहीत आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : २०/१०/२०२५

सही/-
**ॲड. अतुल अरविंद चौगुले**
B.L.S.LL.B.
खरेदीदाराचे वकील
महेश्वर आळी श्रीवर्धन, मु.पो.ता. श्रीवर्धन, जि. रायगड
मो. नं. ७२७६५६३६६७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**महसूल व वनविभाग**
**जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग**
**सामान्य प्रशासन विभाग**
दुरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८ ई-मेलः tahasildargadraigad@gmail.com




क्र.साशा/कार्या-२/ब-१०/ दौरा/ मा.राज्य अतिथी/खाजगी वाहने/ई-निविदा/२०२५ — दि. ३१/१०/२०२५

**ई-निविदा सुचना**

**मा. राज्य अतिथिंच्या परिवहन व्यवस्थेकरीता खाजगी वाहन भाडेतत्वावर करुन घेण्यासाठी ई-निविदा**

रायगड जिल्ह्यातील मा. राज्य अतिथीच्या परिवहन व्यवस्थेकरीता विविध प्रकारची खाजगी वाहने भाडे तत्वावर पुरवठा करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

**कामाचे नाव :-** मा. राज्य अतिथीच्या परिवहन व्यवस्थेकरीता विविध प्रकारची खाजगी वाहने भाडे तत्वावर पुरवठा करणेबाबत.

| | |
|---|---|
| ई निविदा फार्म शुल्क | र.रु. १८,०००/- ( विना परतावा) |
| इसारा/बयाणा (EMD) रक्कम | र.रु.१,८०,०००/- |
| सुरक्षा अनामत रक्कम | र.रु. १,८०,०००/- (एक लाख ऐंशी हजार मात्र) राष्ट्रीयकृत बँकेची गॅरंटी |
| ई- निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दिनांक ०४/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता |
| ई- निविदा भरण्याचा कालावधी | दिनांक ०४/११/२०२५ ते दिनांक १९/११/२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक व वेळ | दि. ०७/११/२०२५ रोजी सकाळी १२.०० वाजता |
| ई-निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. १९/११/२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा फार्म क्रमांक - १ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. २०/११/२०२५ रोजी सायंकाळी ४.०० वा. |
| ई- निविदा उघडण्याचे ठिकाण | सामान्य शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड, अलिबाग |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हाधिकारी (सा.प्र), रायगड, अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२ सदरची निविदा काम प्राप्त करुन देण्याची कोणतीही हमी देत नाही.
३ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.
४ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
५ निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पुर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हाधिकारी (सा.प्र), रायगड यांचे दालनात राहील.

सही/-
**(किशन ना. जावळे)**
**जिल्हाधिकारी रायगड**

विमाका/ कोवि/२०२५-२०२६/१७६

# शेतकऱ्यांना फेरफार पडणार महागात

- तलाठ्यांऐवजी तहसील कार्यालयात मिळणार उतारे
- कर्जतच्या महसूल खात्याचा अजब कारभार



| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुका शेतीबहुल तालुका समजला जातो. या तालुक्यातील शेतकरी प्रयोगशील शेतीसाठी प्रसिद्ध असून, आता त्याच शेतकऱ्यांना आपल्या जमिनीचे सातबारा आणि फेरफार उतारे मिळविण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागणार आहे. यापुढे पाच-सहा गावांचे मिळून बनलेल्या तलाठी कार्यालयात हे उतारे मिळणार नाही. मात्र, ते उतारे मिळविण्यासाठी काहीशे रुपये खर्च करून कर्जत येथील प्रशासकीय कार्यालयात पोहोचवावे लागणार आहे.दरम्यान, महसूल खात्याच्या या शेतकारी विरोधी कारभाराबद्दल शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी असून, शिवसेना ठाकरे पक्षाचे कृष्णा जाधव यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

कर्जततालुकाहाबहुतांशीग्रामीण भाग आहे. तसेच कर्जत तालुक्यात शेतकरी वर्ग खूप मोठा आहे. कर्जत तालुका हा आदिवासीबहुल तालुका म्हणून ओळखला जातो, कर्जतमध्ये मुख्यत्वे शेती हा व्यवसाय असून, शेतकऱ्याला आपल्या शेतीचे दस्तावेज हे जवळच्या तलाठी कार्यालयामध्ये मिळत आहेत. परंतु, आता शेतकऱ्याला आपल्या शेतीचे फेरफार मिळवण्यासाठी थेट तालुक्याच्या गावाला जावे लागणार आहे. कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांचे फेरफार हे गावाजवळ असलेल्या तलाठी कार्यालयात मिळत होते. परंतु, तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी अचानक मंडळ अधिकारी व तलाठी यांना तोंडी आदेश देत फेरफार दप्तर कर्जत तहसील कार्यालयात जमा करण्याचे आदेश देण्यात आले. त्यामुळे बहुतांश फेरफार हे तहसील कार्यालयामध्ये जमादेखील करण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची आता चांगलीच तारांबळ उडणार आहे.

एक फेरफार काढण्यासाठी तालुक्याच्या गावाला जावे लागणार असल्याने शेतकरी वर्गामध्ये नाराजीचे सूर पाहायला मिळत आहे. शासन आपल्या दारी ही योजना कशासाठी राबवली? हादेखील प्रश्न येथे उपस्थित होत आहे. शेतकऱ्याला त्याच्या गावात तलाठी कार्यालयात फेरफार मिळत होते, आता त्याला तालुक्याला फेऱ्या मारावे लागणार आहेत.

जर एखादा शेतकरी नांदगाव व खांडस या भागातून कर्जत तहसील कार्यालयात फेरफार काढण्यासाठी गेला असता त्याला जर का त्या दिवशी फेरफार मिळाला नाही, तर त्यांनी त्या फेरफारसाठी रोज फेऱ्या माराव्यात का? जाणीवपूर्वक शेतकऱ्याला त्रास होणारे उपक्रम शासनाकडून का राबवले जात आहेत. तलाठी कार्यालयातील जुने सातबारा व फेरफार तहसील कार्यालयात तात्काळ जमा करावेत, असा आदेश तहसीलदार यांना पारित झालेला आहे का? असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांना पडले असून, हा आदेश तहसीलदार कार्यालयाने ताबडतोब रद्द करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा व देण्यात आलेले आदेश तसेच जमा केलेले दप्तर पुन्हा संबंधित तलाठी कार्यालयामध्ये पाठवावे, अशा आशयाचे पत्र शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने तहसीलदारांना देण्यात आले आहे.

### शेतकऱ्यांची नाराजी

आमच्या शेतीचे फेरफार तहसील कार्यालयामध्ये जाऊन घ्यावे लागणार असल्याने आमची खूप मोठी धावपळ आणि अडचण निर्माण झाली आहे. तलाठी कार्यालयात त्वरित फेरफार, सातबारा उपलब्ध होत होते व ते जलद गतीनेदेखील आम्हाला मिळत होते. परंतु, आता एक फेरफार काढण्यासाठी पूर्ण दिवस लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्याची मोठी अडचण झाली आहे व त्यासाठी खर्चदेखील होत आहे.

# उल्हास नदीवरील मोहिली पूल धोकादायक

## बांधकाम विभाग लक्ष कधी देणार?

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवर मोहिली येथे असलेला बांधकाम विभागाने बांधलेला पूल धोकादायक स्थितीत उभा आहे. त्या भागातील अनेक गावांचा वाहतुकीचा मार्ग असलेल्या या पुलाच्या दुरुस्तीचे काम मागील अनेक वेळा जिल्हा परिषद बांधकाम विभागाने केले आहे. मात्र, तरीही हा पूल धोकादायक बनला असून, हा पूल वाहतुकीसाठी बंद केला तर मात्र त्या भागातील ग्रामस्थांना फार दूरवरून हेलपाटे मारत आपल्या गावी जावे लागणार नाही.

उल्हास नदीवर मोहिली गावाजवळ जिल्हा परिषद बांधकाम खात्याने ४० वर्षांपूर्वी बांधलेला पूल निकामी होऊ लागला आहे. या पुलाच्या बांधकामाचे खांब हे निखळून जात असल्याचे चित्र त्या ठिकाणी असून, मागील पाच वर्षात जिल्हा परिषद बांधकाम विभागाने या पुलाची दुरुस्ती केली आहे. मात्र, पावसाळ्यात पुलावरून पाणी वाहून गेल्यावर महापुराच्या पाण्यासोबत वाहून गेलेल्या पुलाचे लोखंडी रेलिंग आणि पुलाचा रस्त्याचा पृष्ठभाग वगळता अन्य कोणत्याही प्रकारची दुरुस्तीची कामे बांधकाम विभागाने केलेली नाहीत. सध्या हा पूल सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत असून, पुलाचे खांब निखळू लागले असतानादेखील पुलाच्या दुरुस्तीची कामे बांधाकाम विभाग करताना दिसत नाही.



या पुलावरून पलीकडे भागातील बीड बु. मोहिली, मुगपे आणि चोची या गावांना जोडणारा महत्त्वाचा पूल आहे. उल्हास नदीवरील मोहिली पूल अवजड वाहतुकीमुळे कधीही कोसळू शकतो, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पुलावरून चारचाकी व दुचाकी वाहनांची सतत ये-जा चालू असते. तसेच दगड, माती यांची वाहतूक करणारे अवजड ट्रक व टेम्पो यांची वाहतूक सुरु असते. पुलाची स्थिती लक्षात घेता या पुलावरून होणारी अवजड वाहनांची वाहतूक बंद करण्याची मागणी होत आहे.

## निवडक



### निसर्ग डायग्नोस्टिक सेंटरचे उद्घाटन

**रसायनी :** मोहपाडा बाजारपेठेमध्ये निसर्ग पॅथोलॉजी गेल्या अनेक वर्षांपासून सेवा देण्याचे काम हनुमंत लभडे करीत आहे. विशेष म्हणजे, त्यांनी अनेक ठिकाणी कॅम्प बसवून विनामूल्य, तर काही वेळेस अल्प दरात रक्त तपासणी करुन सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम केले. आज दिवसेंदिवस आजार फैलावत असताना रुग्णांची वाढती संख्या पाहता दुसरी शाखा निसर्ग डायग्नोस्टिक सेंटर लॅटीट्यूट अपार्टमेंट एचडीएफसी बँक व सीएनजी पंपासमोर मोहपाडा येथे रामदास महाराज पाटील- संस्थापक अध्यामिक शिक्षण संस्था गुरुकुल महड यांच्या हस्ते फीत कापून अनावरण करण्यात आले. निसर्ग पॅथोलॉजी तसेच दुसरी शाखा निसर्ग डायग्नोस्टिक सेंटर या दोन्ही रुग्णांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असणार आहे. या अनावरणप्रसंगी अनेक मान्यवरांची उपस्थिती पाहावयास मिळाली. या शाखेच्या शुभारंभाच्या निमित्ताने हरिपाठ, भजन यांचे आयोजन करण्यात आले होते.

### नवघर कासारवाडची कन्या झाली डॉक्टर



**पाली :** सुधागड तालुक्यातील नवघर कासारवाडी येथील ऋतिका राजेश मांगले या विद्यार्थिनीने नुकत्याच झालेल्या (बॅचलर ऑफ होमियोपॅथिक मेडिसिन अँड सर्जरी) परीक्षेमध्ये केडीएमजी एचएमसी शिरपूर-धुळे या कॉलेजमधून घवघवीत यश संपादन केले असून, ती आता डॉक्टर झाली आहे. जिद्द, मेहनत आणि योग्य वेळी स्वदेस फाऊंडेशनकडून मिळालेल्या मदतीच्या बळावर तिने हे स्वप्न साकार केले आहे. रॉनी स्क्रूवाला व झरीना स्क्रूवाला यांच्या स्वदेस फाऊंडेशनच्यावतीने रायगड जिल्ह्यामधील माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर व सुधागड तालुक्यामध्ये ग्रामीण सक्षमीकरणाचे प्रकल्प गाव विकास समितीच्या सहकार्याने राबविण्यात येत आहेत. स्वदेस शिष्यवृत्ती योजना ही त्या उपक्रमाचा एक भाग आहे. शिष्यवृत्तीच्या माध्यमातून शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आत्तापर्यंत ८९७ गरीब व होतकरू विद्यार्थ्यांनी आपले उच्च शिक्षण पूर्ण करून चांगल्या प्रकारची नोकरी मिळवलेली आहे आणि काही विद्यार्थी चांगल्या पद्धतीने शिक्षण घेत आहेत. यामधील ऋतिका ही एक हुशार विद्यार्थिनी आहे. ऋतिकाचे वडील एका कंपनीत काम करत असताना, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची होती. मात्र, आपल्या मुलीला उच्च शिक्षण मिळावे, यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. ऋतिका ही तिच्या कुटुंबातील पहिलीच मुलगी आहे, जिने वैद्यकीय पदवी प्राप्त केली आहे. या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.




### पनवेल महानगरपालिकेत लोकशाही दिन

**नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित राहावे.**

**पनवेल :** सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये सोमवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गादर्शनाखाली लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत नागरी सेवा सुविधा विभाग व इतर असे चार अर्ज दाखल झाले होते. या अर्जांची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या. या कार्यक्रमास परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त मंगला माळवे, उपायुक्त नानासाहेब कामठे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, प्रभाग अधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत ठाकरे गट आक्रमक

| अलिबाग | प्रतिनिधी |

तालुक्यातील सर्वच रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या अपघातांमध्ये काही नागरिकांना आपला जीव गमवावा लागला असून, काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. रस्त्यांच्या या दुरवस्थेबाबत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. पुढील १५ दिवसांत रस्त्यांवरील खड्डे न भरल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर भीक मागो आंदोलन करणार असल्याचे निवदेन बांधकाम खात्याच्या कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आले.




दरम्यान, आंदोलनाच्या माध्यमातून मिळालेले पैसे सार्वजनिक बांधकाम विभागाला खड्डे भरण्यासाठी देण्यात येणार असल्याचेदेखील निवेदन देतेवेळी सांगण्यात आले आहे.

अलिबाग तालुक्यातील सर्वच अंतर्गत रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. खड्डे चुकविताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून, वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. परंतु, खड्डे बुजविण्याकडे संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने केला आहे.

शिवसैनिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय गाठले आणि कार्यकारी अभियंता एम.एम. धायतडक यांना निवेदन दिले. या निवेदनाच्या माध्यमातून पुढील १५ दिवसांत खड्डे न भरल्यास भीक मागो आंदोलन करण्याचा इशारादेखील देण्यात आला आहे. यावेळी ठाकरे गटाचे जिल्हा सल्लागार सतीश पाटील, तालुकाप्रमुख शंकर गुरव, अलिबाग विधानसभा मतदारसंघ प्रवक्ते धनंजय गुरव, कार्यालयीन प्रमुख सुरेश झावरे आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.

# रायगडमध्ये शिवसेनेला धक्का

## भरत गोगावलेंच्या निकटवर्तीय शेकडो कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

| महाड | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात राजकीय समीकरणं पुन्हा एकदा ढवळून निघाली आहेत. शिवसेनेचा प्रभाव क्षेत्र मानल्या जाणाऱ्या महाडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुनील तटकरे यांनी थेट मंत्री भरत गोगावले यांच्या गटात मोठी घुसखोरी करत मोठा राजकीय डाव साधला. भरत गोगावले यांचे निकटवर्तीय आणि महाडमधील युवा उद्योजक सुशांत जाबरे यांनी शेकडो समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

खा. सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत जाबरे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश झाला. यावेळी मोठ्या संख्येने तरुण कार्यकर्त्यांनीही शिवसेनेचा झेंडा सोडून राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा हाती घेतला. जाबरे हे मंत्री भरत गोगावले यांचे चिरंजीव विकास गोगावले यांचे अत्यंत जवळचे मित्र मानले जातात. त्यामुळे हा प्रवेश हा गोगावले यांच्या गटासाठी मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. सुशांत जाबरे यांना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादीकडून जिल्हा परिषदेचे तिकीट मिळण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या प्रवेशामुळे महाडमधील राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल घडणार असल्याचे संकेत मिळत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुनील तटकरे यांनी सांगितलं की, रायगड जिल्ह्यात युवा नेतृत्व तयार करणं हे आमचं ध्येय आहे.

# पृथा पाटील होणार डॉक्टर

| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी |



श्रीवर्धन तालुक्यातील कापोली हे गाव अगदी खेडेगाव असून, याच गावातून पृथा ही तिसरी डॉक्टर होणार आहे. मुंबई-जोगेश्वरी येथे वास्तव्य करणारे श्रीवर्धन तालुक्यातील कापोली गावचे रहिवासी कुणबी सहकारी बँक अधिकारी जनार्दन कानू पाटील यांचे चिरंजीव महेंद्र पाटील यांची पृथा ही कन्या आहे. तिला कर्जत येथील तासगावकर मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएससाठी प्रवेश मिळाला आहे. तिला दहावीमध्ये ९६ टक्के तर बारावी परीक्षेत ८७ टक्के गुण मिळाले होते. तर, नीटच्या परीक्षेत ४८० गुण मिळवून ती एमबीबीएससाठी पात्र ठरली आहे.

# रस्त्यासाठी उपोषणाच्या पवित्र्यात

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांना निवेदन

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

मोरोंडे- बारशेत रस्ता मंजूर होऊन दहा महिने उलटून गेली आहेत. मात्र वन विभागाची कारणे सांगत या रस्त्याचे काम केले जात नाही.या कारभाराबाबत डोंगरगाव विकास संघर्ष समितीमध्ये (सत्यवाडी, होन्डावाडी, तागवाडी, बारशेत) नाराजीचे सूर उमटले आहेत. त्यामुळे रस्त्यासाठी समितीच्या वतीने मधुकर ढेबे व ग्रामस्थ उपोषणाच्या पवित्र्यात आहेत. येत्या १२ नोव्हेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत त्यांनी सोमवारी (दि.३) जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले आहे.




अलिबाग तालुक्यातील बोरघर ग्रामपंचायत हद्दीतील बारशेत (मोरांडे) रस्ता महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था कार्यकारी अभियंता कार्यालय रायगड यांच्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर झाला आहे. या कामांचा कार्यारंभ आदेश ६ डिसेंबर २०२४ मध्ये काढण्यात आला असून, हैदराबाद येथील मे सुधाकरा इन्फ्राटेक प्रा.लि. या कंपनीला ठेका देण्यात आला आहे. बारशेत या सहा किलोमीटर ७०० मीटर रस्त्यामध्ये चार गावांचा समावेश असून, सत्यवाडी, होंडावाडी, तागवाडी, बारशेत या वाड्या आहेत. एकूण एक हजार २७ लोकसंख्या आहे.

रस्ता डोंगराळ भागातील असल्याने उपजीविका, शिक्षण, बाजारपेठत जाण्यासाठी तसेच दैनंदिन कामकाजासाठी जीव मुठीत घेऊन पायपीट करावी लागत आहे. आजारी व्यक्तीसह गर्भवती महिलांना कापडी डोली करून सात किलोमीटर चालत उपचारासाठी घेऊन जावे लागत आहे. बारशेत रस्ता मंजूर असताना गेल्या दहा महिन्यांपासून रस्त्याचे काम केले नाही. याबाबत ठेकेदार प्रतिनिधी व उपअभियंता कार्यालयाशी वेळोवेळी संपर्क साधण्यात आला. बारशेत रस्ता वनविभागाच्या जागेतून जात आहे. वनविभागाकडून परवानगी मिळाली नाही. त्यामुळे रस्त्याच्या कामाला सुरुवात करता येत नाही, असे त्यांच्याकडून सांगण्यात आले. याबाबत मागील महिन्यात २७ ऑक्टोबरला निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांची भेट घेऊन त्यांच्याकडे गाऱ्हाणे मांडण्यात आले. वनविभाग, कंत्राटदार, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे अधिकारी यांची बैठक लावण्याचे आश्वासनही दिले. मात्र, गेली अनेक दिवस उलटूनही त्याची कार्यवाही झाली नाही.

# युती तुटली, आघाडी भक्कम

## कर्जत तालुक्यातील राजकीय गणिते बदलणार

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीमध्ये आता राष्ट्रादी काँग्रेस पक्ष समाविष्ट झाला आहे. त्यामुळे तालुक्यात महाविकास आघाडी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भक्कम झाल्याचे चित्र आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महायुतीमधून बाहेर पडत शिवसेना ठाकरे पक्षाबरोबर आघाडी करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. दरम्यान, शिवसेना आणि भाजप यांची युती आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दिसणार की निवडणुका तिरंगी होणार? याबाबत जोरदार चर्चा सुरु झाली आहे.

नवीन राजकीय समीकरणांमुळे मतदारसंघातील गणिते बदलली आहेत. मात्र, त्याचवेळी कर्जत तालुक्यात महाविकास आघाडी भक्कम झाली असल्याचे स्पष्ट झाले आहे. सुधाकर घारे यांना अपक्ष म्हणून पडलेली मते आणि शिवसेना ठाकरे पक्षाचे महाविकास आघाडीचे उमेदवार नितीन सावंत यांना पडलेली मते यांची होणारी बेरीज लक्षात घेऊन तालुक्यात ही आघाडी मजबूत झाली आहे. कर्जत तालुक्यात शिवसेना ठाकरे पक्ष तसेच शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष आणि राष्ट्रीय काँग्रेस यांची महाविकास आघाडी आहे. या आघाडीमध्ये आता राष्ट्रवादी काँग्रेस सहभागी झाला आहे.

नवीन आघाडीमुळे तिकीट वाटपात नाराजी समोर येण्याची शक्यता आहे. मात्र, त्यावेळी शिवसेना आणि भाजप यांच्यातदेखील तिकीट वाटपावरून चढाओढ दिसत आहे.

**कामामध्ये पारदर्शकता वाढविण्यासाठी उपक्रम | नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा उपक्रम**

# व्याख्यानातून भ्रष्टाचार निर्मूलनाचा संदेश

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

नवी मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्यावतीने दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. पनवेल महानगर पालिका येथे वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानातून भ्रष्टाचार निर्मूलनाचा संदेश पोहोचविण्यात आला. यावेळी भ्रष्टाचार मुक्त प्रशासन, सशक्त आणि एकसंध भारत घडवू, कामामध्ये पारदर्शकता वाढविण्याबाबत जनजागृती करण्यात आली.




यावेळी पनवेल महानगर पालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, ठाणे येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक भागवत सोनावणे, नवी मुंबईचे पोलीस उपअधीक्षक धर्मराज सोनके, पनवेल महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, पोलीस अंमलदार, महानगर पालिकेचे अधिकारी, कर्मचारी इतर विभागातील शासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

दक्षता आपली सामायिक जबाबदारी ही संकल्पना खूप महत्त्वाची आहे. प्रत्येक नागरिकाची ही जबाबदारी असून, त्यांनी दक्ष राहावे, भ्रष्टाचाराला आळा बसविण्याची माहिती मान्यवरांनी देत दक्षता जनजागृती सप्ताहाचे महत्त्व स्पष्ट केले. सर्वांनी आपले काम प्रामाणिकपणे करावे, भ्रष्टाचार थांबविण्यासाठी सर्वांनी एकत्र प्रयत्न केले पाहिजे, असे सांगत भ्रष्टाचाराचे आणि लाच घेण्याचे दुष्परिणाम समजावून सांगण्यात आले.

### एसीबीकडून आवाहन

दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्यावेळी मार्गदर्शन करताना नागरिकांनी सरकारी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरोधात भ्रष्टाचारसंबंधित तक्रारी असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नवी मुंबई येथे टोल क्रमांक १०६४, व्हॉट्सअॅप क्रमांक ७०६६६३५६६६ येथे संपर्क साधावा, असे आवाहन नवी मुंबईचे पोलीस उपअधीक्षक धर्मराज सोनके यांनी केले.

# अलिबागमध्ये डॉक्टरांचा कँडल मार्च

## डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी निषेध

| रायगड | प्रतिनिधी |

फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणाचा तपास योग्य पद्धतीने करून डॉ. मुंडे यांना न्याय मिळवून द्यावा यासाठी राज्यभरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयीन विद्यार्थी व डॉक्टरांतर्फे रविवारी कँडल मार्च काढण्यात आला. अलिबागमध्ये रायगड जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयीन विद्यार्थी व डॉक्टर्सतर्फे सायंकाळी कँडल मार्च काढण्यात आला.

डॉ. संपदा मुंडे या सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. २८ वर्षीय वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांचा एका हॉटेलच्या खोलीत मृतदेह आढळला होता. डॉ. मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणावरून राज्यातील वैद्यकीय क्षेत्रात आवाज उठविला जात आहे. डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणाचा तपास योग्य पद्धतीने करून डॉ. मुंडे यांना न्याय मिळवून द्यावा यासाठी राज्यभरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयीन विद्यार्थी व डॉक्टरांतर्फे रविवारी कॅन्डलमार्च काढण्यात आला. अलिबागमध्ये रायगड जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयीन विद्यार्थी व डॉक्टर्सतर्फे सायंकाळी कँडल मार्च काढण्यात आला.




अलिबागमधील जिल्हा शासकीय रुग्णालय ते बालाजी नाका या मार्गावर कँडल मार्च काढण्यात आला. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी व डॉक्टर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी जिल्हा शासकीय महाविद्यालयातील मार्टच्या अध्यक्षा डॉ. अलका मुंडे यांनी सांगितले की, डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणाला ज्या पद्धतीने राजकीय वळण दिले जात आहे, ज्या पद्धतीने तपास केला जात आहे, त्याविरोधात कँडलमार्च काढण्यात आला आहे.

# महिला क्रिकेटचे चक दे!

भारतीय महिलांनी विजयाचे नवे शिखर पादाक्रांत केले आहे. रविवारी दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून महिला क्रिकेट संघाने विश्वकरंडकावर आपले नाव कोरले आणि नवा इतिहास घडवला. १९८३मध्ये कपिल देवच्या संघाने पहिल्यांदा एकदिवसीय सामन्यांचा विश्वचषक जिंकला आणि भारतीय क्रिकेटने कात टाकली. आज क्रिकेटच्या छोट्याशा जगात भारत हा बादशहा आहे. पुरुषांच्या संघाकडे टी-२० चा विश्वचषक आहे. तर ५० षटकांच्या विश्वकरंडकाच्या भारतीय महिला आता सम्राज्ञी आहेत. हा विक्रम केवळ क्रिकेटच नव्हे तर प्रत्येक क्षेत्रातील भारतीय महिलांना प्रेरणा देणारा ठरेल यात शंका नाही. या विश्वकरंडक विजयाची तुलना अनेक जण कपिल देव संघाच्या पहिल्या विजयाशी करीत असले तरी ती पूर्णांशाने योग्य नाही. १९८३ मध्ये भारत अंतिम फेरीत गेला तेव्हा कोणाच्या खिजगणतीतही नव्हता आणि वेस्ट इंडिजसारख्या जगज्जेत्यांसमोर ते अगदीच छोटे होते. याउलट आपल्या महिला क्रिकेट संघाने गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने चमकदार कामगिरी केलेली आहे. २००५ आणि २०१७ या दोन वर्षी भारतीय संघाने अंतिम फेरीत धडक मारली होती. २०१७ मध्ये तर अगदी हातातोंडाशी आलेला विजय हुकला होता. मिताली राज कप्तान असलेल्या त्या संघाला इंग्लंडविरुध्द केवळ नऊ धावा कमी पडल्या होत्या. त्यानंतरच्या आठ वर्षांमध्ये विश्वचषकांमध्ये भारतीय संघ उपांत्य लढतींमध्येच गारद होत असला तरी त्याचा दबदबा वाढला होता. कारण, त्याने ऑस्ट्रेलिया व इंग्लंडसारख्या ताई संघांना देखील अनेकदा हरवले होते. यंदाच्या विश्वचषकातील त्यांची वाटही सोपी नव्हती. प्राथमिक फेरीमध्ये इंग्लंड, ऑस्ट्रेलिया व आफ्रिका या तीन संघांविरुध्द भारताचे सलग तीन पराभव झाले होते. त्यावेळी आपले आव्हान असे संपले असे वाटत असतानाच न्यूझीलंडविरुध्द ५३ धावांनी मिळालेला विजय संघाला नवे बळ देणारा ठरला. त्यानंतरची ऑस्ट्रेलियाविरुध्दची लढत ऐतिहासिक ठरली. सात वेळा विश्वचषक जिंकणारा ऑस्ट्रेलियाचा संघ सर्वश्रेष्ठ मानला जातो. त्यातच ३३९ धावांच्या मोठ्या आव्हानासमोर आपले दोन बळी झटपट गेले होते. पण हरमनप्रीत कौर आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांच्या भागीदारीने कमाल केली व अविश्वसनीय विजय मिळवून दिला.

## तीन पिढ्यांचे कष्ट

हॉकीमध्ये महिला संघाचा पूर्वापार दबदबा होता. पण महिला क्रिकेटचा पाया देशात घातला गेला तो १९७० च्या दशकात. त्यावेळी मुंबई ही क्रिकेटची पंढरी असल्याने पहिल्या महिला खेळाडू मुंबईच्या परिसरातल्या वा मुंबईतून खेळणाऱ्या होत्या. आज भारतीय संघातील खेळाडू बारा विविध राज्यांमधून येतात. त्यात महाराष्ट्र व पंजाबच्या प्रत्येकी तीन खेळाडू आहेत. तर हिमाचल, आसाम, हरियाणा, आंध्र, उत्तरांखंड इत्यादींच्या एकेक आहेत. क्रांती गौड ही मध्यप्रदेशाच्या आदिवासी भागातून येते तर श्री चरणी ही आंध्राच्या मागास कडाप्पा जिल्ह्यातील आहे. नऊ जणी अशा आहेत ज्या पहिल्यांदाच विश्वकरंडक खेळत होत्या. एक काळ असा होता की, महिलांना जवळपास फुकटात खेळावे लागत असे. स्पर्धेच्या साम न्यांसाठी रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाने अनारक्षित डब्यातून प्रवास करावा लागे व त्यांची राहण्याची सोय शाळेच्या वर्गांमध्ये किंवा मंगल कार्यालयांमध्ये केली जात असे. शांता, डायना एडलजी, शुभांगी कुलकर्णी, सुधा शाह अशासारख्या खेळाडू निव्वळ खेळाच्या वेडातून व प्रेमातून पुढे जात राहिल्या. आज महिला क्रिकेटचे जे वैभव दिसते आहे त्याचा पाया या खेळाडूंनी घातला हे विसरून चालणार नाही. २००० नंतर भारतीय क्रिकेटमध्ये प्रचंड पैसा येऊ लागला. त्यातच २००५मध्ये विश्वकरंडकाच्या अंतिम फेरीत गेल्याने महिला क्रिकेटलाही बीसीसीआयने पैसे द्यायला हवेत असा दबाव आला. तेव्हा एका एकदिवसीय सामन्यासाठी २५०० रुपये दिले जात. आज एकेका सामन्यासाठी लाखो रुपये दिले जातात. याखेरीज प्रायोजकांकडून मिळणारे पैसे आणि विजयी झाल्यावर होणारी पैशांची खैरात ही कोट्यवधींच्या घरात जाते. आता कालच्या विजयाने महिला क्रिकेटला पुरुषांच्या बरोबरीलाच नव्हे तर एक इंचभर पुढेच आणून ठेवले आहे. आजवर महिला क्रिकेटपटूंची नावे फारशी कोणाला ठाऊक नसत. आता भारतीय क्रिकेट रसिकांना त्यांचे पराक्रम तोंडपाठ असतील. काल नवी म ुंबईत ज्या संख्येने लोकांनी सामना पाहायला गर्दी केली ती पाहता इथून पुढे बीसीसीआयसाठी पैशांचे नवीन दालन खुले झाले आहे असे म्हणायला हरकत नाही. आजवर लोकसंख्येतील निम्मा हिस्सा राष्ट्रीय खेळ या प्रकारात दुय्यम वा अदखलपात्र होता. तो आता बरोबरीला आला आहे.

## सरासरी २६, भवितव्य उज्वल

अंतिम सामन्यात आफ्रिकेसमोर ठेवलेले आव्हान खूप मोठे नव्हते. मात्र हरमनप्रीतच्या नेतृत्वाखाली सर्वांनी उत्तम सांघिक खेळ केला व पहिले जागतिक विजेतेपद खेचून आणले. या विजयी संघातील बहुतांश मुली वीस ते तीस वयोगटातील आहेत. कर्णधार हरमन मात्र तब्बल ३६ वर्षांची आहे. २०१७ मध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या विश्वचषकात तिने ऑस्ट्रेलियाविरुध्दच्या उपांत्य लढतीत नाबाद १७१ धावा करून सामना फिरवला होता. आता आठ वर्षांनंतर तशाच उपांत्य लढतीत तिची ८९ धावांची खेळी निर्णायक ठरली. फिटनेस व सातत्य यांची ही कमाल होय. फुटबॉलपटू रोनाल्डो चाळिशीचा असूनही विश्वचषक खेळण्याचे स्वप्न पाहतो आहे. धोनी आणि पूर्वी तेंडुलकर चाळिशीपार झाल्यानंतरही समर्थपणे खेळत होते. एकूण खेळाडूंचा मैदानावरचा मुक्काम आता वाढत चालला आहे. दुसरीकडे खूप लहान वयात प्रचंड यश संपादन करण्याचे प्रमाणही वाढत चालले आहे. प्रतिका रावल जखमी झाल्यामुळे ऐनवेळी संघात समावेश झालेली शफाली वर्मा केवळ २१ वर्षांची आहे. तिने आफ्रिकेविरुध्द ८७ धावा केल्या आणि महत्वाचे दोन बळीही घेतले. सध्या भारतीय संघाचे सरासरी वय २६ आहे. पूर्वीच्या काय किंवा सध्याच्या काय सर्वच खेळाडूंची कहाणी स्फूर्तीदायी आहे. पूर्वी मिताली राजवर चित्रपट निघाला होता. आता भारतीय विजयाच्या या कामगिरीवरही चित्रपट निघेल यात शंका नाही. सध्याच्या संघातील दीप्ती शर्मासारखी अष्टपैलू खेळाडू आहे. तिने एकदिवसीय सामन्यांमध्ये दीडशेहून अधिक बळी घेतले असून २००० धावा केल्या आहेत. शिवाय आरर्लंडविरुध्दच्या तिच्या १८८ धावा या भारतातर्फेच्या सर्वोच्च धावा आहेत. काल तीच स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरली. सिलिगुडीची रिचा घोष ही महेंद्रसिंग धोनीसारखीच उत्तम यष्टिरक्षक आणि मॅच फिनिशर आहे. तिचा खेळ म्हणजे चौकार व षटकारांची आतषबाजी असते. त्यामुळेच तिचेही आता धोनीसारखेच चाहते तयार झाले आहेत. महाराष्ट्राच्या सांगलीची स्मृती मनधाना ही गेली दहा वर्षे संघात असूनही सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. यंदा तिने न्यूझीलंडविरुध्द शतक आणि ऑस्ट्रेलिया व इंग्लंडविरुध्द अर्धशतके झळकावली. जेमिमा रॉड्रिग्ज ही मुंबईची खेळाडू तर सध्याची स्टार आहे. आपल्याकडे थोडी कमी आहे ती वेगवान गोलंदाजांची व चांगल्या क्षेत्ररक्षणाची. पण यंदाच्या विश्वचषकातील कामगिरी पाहता तीही थोड्याच दिवसात दूर होईल यात शंका नाही.

विचार

# हरितगृह वायू उत्सर्जनांमुळे हानी

***आशिया खंडात हरितगृह वायू उत्सर्जनावर भर दिला जात असला, तरी जगातील अनेक देशांनी याबाबतचे नियम धाब्यावर बसवले आहेत. रशिया-युक्रेन युद्धात तर मोठ्या प्रमाणात वायूंचे उत्सर्जन झाले आहे. अमेरिका, चीन, रशियासारख्या देशांनी आणि युद्धखोर राष्ट्रांनी हरितगृह वायू उत्सर्जनाला अंकुश लावला नाही, तर जगणेच अवघड होऊन जाईल. हा आजघडीला मोठा आंतरराष्ट्रीय प्रश्न बनला आहे.***



मिलिंद बेंडाळे

अनेक प्रमुख आशियाई अर्थव्यवस्था आता कार्बन कॅप्चर अँड स्टोरेज (सीसीएस) तंत्रज्ञानाचा विचार करत आहेत; परंतु प्रत्यक्षात हवाम ानबदलाच्या उपायासाठी एक दिशाभूल करणारा प्रयत्न आहे. त्याचा सिल्व्हर बुलेट किंवा रामबाण उपाय म्हणून प्रचार केला जात आहे. 'कार्बन कॅप्चर' आणि स्टोरेज म्हणजे वीज प्रकल्प, कारखाने किंवा कोणत्याही मोठ्या प्रमाणात कारखान्यांमधून उत्सर्जित होणारा कार्बन डायऑक्साइड कॅप्चर करणे, तो हवेत जाण्यापासून रोखणे आणि जमिनीखाली साठवणे. हे आकर्षक वाटत असले, तरी ते अद्याप मोठ्या प्रमाणात यशस्वी झालेले नाही. खरे तर, खऱ्या समस्येवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी जीवाश्म इंधन जाळून उत्सर्जित होणारा धूर लपवण्याचा हा प्रयत्न आहे. जागतिक संशोधन संस्थेच्या 'क्लायमेट ॲनॅलिटिक्स'च्या अहवालात म्हटले आहे, की चीन, भारत, जपान, कोरिया, इंडोनेशिया, थायलंड, मलेशिया, सिंगापूर आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांनी 'सीसीएस' पूर्णपणे स्वीकारल्यास २०५० पर्यंत अतिरिक्त २५ अब्ज टन हरितगृह वायू उत्सर्जन कमी होऊ शकते. यामुळे पॅरिस करारच रद्द होईल असे नाही, तर त्यांच्या स्वतःच्या अर्थव्यवस्थेचेही मोठे नुकसान होऊ शकते. घरात आग लागली, धूर काढून टाकणारे यंत्र विकत घेतले आणि आग शमवण्याचा प्रयत्नही केला नाही, तर घर वाचेल का? 'कार्बन कॅप्चर अँड स्टोरेज' (सीसीएस) तंत्रज्ञानाबाबतही हेच खरे आहे. 'क्लायमेट ॲनॅलिटिक्स'चे 'सीईओ' बिल हेअर म्हणतात, 'ही रणनीती हवामानासाठीच नाही तर 'सीसीएस' अवलंबल्याने अडकू शकणाऱ्या अर्थव्यवस्थांसाठीही खूप धोकादायक आहे.

'कार्बन कॅप्चर अँड स्टोरेज' तंत्रज्ञानाची विशिष्ट क्षेत्रांमध्ये संभाव्य भूमिका असूनही हा अहवाल निव्वळ शून्य लक्ष्यांना कमकुवत करण्यासाठी आणि तेल, जीवाश्म वायू आणि इतर प्रदूषणकारी इंधनांमध्ये सुरू असलेल्या गुंतवणुकीला न्याय देण्यासाठी त्याचा गैरवापर अधोरेखित करतो. आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्था आणि हवामानबदलावरील आंतरसरकारी पॅनेल (आयपीसीसी) सारख्या संस्थांच्या वैज्ञानिक शिफारसींच्या तुलनेत या चुकीच्या दृष्टिकोनाचा प्रसार चिंताजनक आहे. अनेक देश २०२५ पर्यंत राष्ट्रीयदृष्ट्या निर्धारित योगदानाच्या पुढील फेरीची तयारी करत आहेत. अहवालात म्हटले आहे, की जपान आणि कोरिया या तंत्रज्ञानाच्या बाजारपेठेत पुढे राहण्यासाठी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर 'सीसीएस'ला प्रोत्साहन देत आहेत. खरेच, ऑस्ट्रेलिया आणि आग्नेय आशियाई देश तेल आणि वायू महसूल वाचवण्यासाठी कार्बन साठवणूक आणि संक्रमण केंद्र म्हणून स्वतःला स्थापित करण्याचा प्रयत्न करत आहेत. चीन आणि भारत या दोन्ही देशांनीही 'सीसीएस' स्वीकारले तर ते एक मोठे आव्हान ठरू शकते. कारण त्यांच्यासाठी अक्षय पर्याय खूपच स्वस्त आणि सुरक्षित आहेत. जीवाश्म इंधन लॉबी या परिस्थितीनुसार आपली रणनीती आखत आहे. हवामानबदल नाकारण्याऐवजी, ते संकट सोडवण्यातला एक प्रमुख घटक म्हणून स्वतः ला पुन्हा स्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. म्हणूनच 'सीसीएस' ला 'सिल्व्हर बुलेट' उपाय म्हणून सादर केले जात आहे. 'सीसीएस'च्या क्षमतेला अतिरंजित करण्याचे जीवाश्म इंधन लॉबीचे प्रयत्न पारदर्शक आणि माहितीपूर्ण चर्चेचे महत्त्व अधोरेखित करतात.

वस्तुतः राष्ट्रे अर्थपूर्ण हवामान कृतीसाठी प्रयत्न करत असताना उद्योगांच्या कथांचे परीक्षण करणे आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या वास्तविकतेबद्दल आणि हवाम ान बदलाविरुद्धच्या लढाईतील त्यांच्या भूमिकेबद्दल सार्वजनिक योग्य समज देणे आवश्यक बनते. आज आशिया एका चौरस्त्यावर उभा आहे. एका बाजूला अक्षय ऊर्जा आहे, जी परवडणारी, विश्वासार्ह आणि भविष्यासाठी योग्य आहे तर दुसऱ्या बाजूला 'सीसीएस' तंत्रज्ञान आहे, जे खूप महागडे आहे. आशियाने चुकीचा मार्ग स्वीकारला, तर केवळ ग्रहच उष्ण होणार नाहीत; या देशांचे स्वतःचे खिसे आणि भविष्यदेखील धोक्यात येईल. दिवाळी तसेच अन्य काळात फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांबाबत अनेकदा नाराजी व्यक्त केली जाते. सण किंवा कार्यक्रमांमध्ये फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांबद्दल लोकसंख्येचा एक मोठा भाग अनेकदा नाराज असतो. प्रदूषणाचा मुद्दा उपस्थित केला जातो. ही चिंता काही प्रमाणात वैध असली, तरी युद्धामुळे होणाऱ्या प्रदूषणाच्या बाबतीत ही चिंता लक्षात घेतली जात नाही. दोन देशांमधील युद्धांमुळे होणारे प्रदूषण हवाच नाही, तर मातीदेखील प्रदूषित करत आहे.

खरे तर, रशिया आणि युक्रेनचा विचार केल्यास त्यांच्या संघर्षातून निघणारा धूर अनेक देशांच्या वार्षिक कार्बन उत्सर्जनापेक्षा जास्त आहे. सरकारे अनेकदा युद्धातील मृतांबद्दल बोलतात; परंतु त्यांच्या पर्यावरणीय परिणामांकडे दुर्लक्ष केले जाते. बरीच माहिती गोपनीय राहते, त्यामुळे संशोधक अचूक डेटा गोळा करू शकत नाहीत. ते डेटा गोळा करण्यासाठी युद्धग्रस्त भागांना भेट देऊ शकत नाहीत. असे असूनही, युद्ध प्रदूषणाच्या हानिकारक परिणामांची व्याप्ती दर्शवणारे काही काम केले जात आहे. 'द इनिशिएटिव्ह ऑन ग्रीनहाऊस गॅस अकाउंटिंग ऑफ वॉर' (आयजीजीएडबल्यू) हा 'युरोपीयन क्लायमेट फाउंडेशन' तसेच जर्मनी आणि स्वीडन यांच्याकडून समर्थित एक संशोधन गट आहे आणि तो संघर्षांमुळे होणाऱ्या प्रदूषणावर काम करतो. रशिया-युक्रेन युद्धाच्या पहिल्या दोन वर्षांमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन इतके लक्षणीय होते, की ते जागतिक स्तरावर अंदाजे १७५ लहान आणि मध्यम आकाराच्या देशांच्या वार्षिक उत्सर्जनापेक्षा जास्त होते. याचा अर्थ असा, की या देशांच्या एकूण वार्षिक कार्बन डायॉक्साईड उत्सर्जनाचा स्वतंत्रपणे विचार केल्यास केवळ रशिया आणि युक्रेनम धील लष्करी कारवायांमुळे निर्माण होणारे वायू खूपच जास्त होते. युद्धकाळातील प्रदूषण केवळ हल्ल्यांम ुळेच नाही, तर लष्करी हालचालींमुळेही होते. एका अहवालानुसार, रशियाच्या युक्रेनवरील आक्रमणाच्या पहिल्या तीन वर्षांत अंदाजे २३७ दशलक्ष टन कार्बन उत्सर्जित झाला. हे अनेक घटकांमुळे होते. रणगाडे, विमाने आणि इतर लष्करी उपकरणांचा वापर यासारख्या लष्करी कारवायांचा त्यात समावेश आहे. शहरे, जंगले आणि शेतजमिनीमध्ये स्फोटक आगी लागतात. निर्वासित आणि विस्थापित लोकांच्या हालचालींमधून धूर निघतो. आपण लहानमोठे १७५ देश वगळले, तरी हे उत्सर्जन ऑस्ट्रिया, हंगेरी, चेक प्रजासत्ताक आणि स्लोवाकियाच्या एकत्रित वार्षिक कार्बन उत्सर्जनाइतके आहे. युद्धामुळे इतर अनेक विषारी वायूदेखील बाहेर पडतात. त्यामुळे जागतिक तापमानवाढीला हातभार लागतो. रशियाने युक्रेन युध्दाच्या सुरुवातीच्या काळात जाणूनबुजून ऊर्जा पायाभूत सुविधांना लक्ष्य केले. त्यामुळे विविध हरितगृह वायूंची मोठ्या प्रमाणात गळती झाली. यासंदर्भातील सर्वात महत्त्वाचे उदाहरण म्हणजे 'नॉर्ड स्ट्रीम-२' पाइपलाइनचे नुकसान. ही पाइपलाइन खराब झाली, तेव्हा समुद्रात मोठ्या प्रमाणात मिथेन वायू सोडण्यात आला.

त्यामुळे १४ दशलक्ष टन कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन झाले. युक्रेनच्या 'उच्च-व्होल्टेज पॉवर नेटवर्क'वरील रशियाच्या हल्ल्यांमुळे सल्फर हेक्साफ्लोराइड हा अत्यंत विषारी वायू बाहेर पडला. रशिया-युक्रेन युद्धादरम्यान झालेल्या विस्थापनामुळेदेखील लक्षणीय प्रदूषण झाले.

या युद्धाने संपूर्ण वर्षात शंभर देशांपेक्षा अधिक प्रदूषण केले आहे. एका अहवालानुसार, युद्धामुळे पहिल्या १५ महिन्यांमध्ये अंदाजे ३१ दशलक्ष टन कार्बन उत्सर्जन झाले. हे २०२३ च्या संपूर्ण वर्षातील कोस्टा रिका आणि इस्टोनियाच्या एकत्रित उत्सर्जनापेक्षा जास्त आहे. युद्ध प्रदूषण हे कोणत्याही एका दिवसाच्या फटाक्यांच्या प्रदर्शनापेक्षा खूप जास्त आहे, तरीही यासाठी कोणालाही जबाबदार धरले जात नाही. कोणताही देश संयुक्त राष्ट्रांकडे किंवा इतरत्र त्याची तक्रार करत नाही. लष्करी गुप्तता हे याचे एक प्रमुख कारण आहे. प्रत्येक देश आपल्या लष्कराचा ऊर्जा वापर, शस्त्रास्त्रांची हालचाल आणि इंधन वापर गुप्त ठेवतो आणि डेटा सार्वजनिक करणे टाळतो. याव्यतिरिक्त, 'क्योटो प्रोटोकॉल' आणि पॅरिस करारानुसार विविध देशांना लष्करी उत्सर्जन डेटा सामायिक करणे अनिवार्य नाही. लष्करी प्रदूषणाचा विचार केला गेला, तर असे देश जागतिक प्रदूषकांच्या क्रमवारीत वरच्या स्थानावर दिसतील. त्यांना हवामान कर भरावा लागू शकतो किंवा निर्बंधांना सामोरे जावे लागू शकते, म्हणूनच या विषयाकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

# वंचित घटकाला न्याय कधी मिळणार

प्रमोद जाधव

मागासवर्गीय, वंचित घटकांच्या सर्वांगिण विकासासाठी अलिबागमधील गोंधळपाडा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बांधण्यात आले. मात्र काही वर्षातच ही इमारत धोकादायक ठरली. त्यामुळे येथील अनेक कार्यालये खाली करण्यात आली. मात्र अजूनपर्यंत या जीर्ण इमारतीच्या जागी नवीन इमारत बांधण्याची हालचाल सुरु झाली नाही. धोकादायक इमारत पडीक अवस्थेत आहे. वंचित कार्यालयाच्या शैक्षणिक, सामाजिक विकासासाठी हक्काचे कार्यालय नसल्याने हा समाज एका छताखाली मिळणाऱ्या सुविधांपासून दुरावला आहे. वंचित घटकाला न्याय कधी मिळणार असा प्रश्न जनमानसातून उमटला जात आहे.

अनुसूचित जाती, नवबौध्द घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य विशेष सहाय्य विभागामार्फत अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बांधण्यात आले. त्यासाठी सुमारे सात कोटीहून अधिक रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. या इमारतीचा उद्घाटन सोहळा १५ ऑगस्ट २०१४ रोजी झाला. मागासवर्गीय घटकांच्या विकासासाठी तळ मजल्यावर श्यामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, संत रोहीदास चर्माद्योग व चर्मकार विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ ही सहा कार्यालये. पहिल्या मजल्यावर समाजकल्याण सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, सभागृह व कर्मचाऱ्यांचे कार्यालय आणि दुसऱ्या मजल्यावर जात पडताळणी कार्यालय सुरु करण्यात आले. या इमारतीतून वंचित घटकांचा सर्वांगिण विकास होण्याची आशा पल्लवीत झाली होती. परंतु उद्घाटन होऊन अवघ्या चार वर्षातच इमारतीचा स्लॅब कोसळू लागला. भिंतीना तडे पडू लागले. पावसाळ्यात गळती होऊ लागली. अनेक समस्यांच्या गर्तेत ही इमारत सापडली. इमारतीमध्ये काम करणारे कर्मचारी, कामानिमित्त येणारे विद्यार्थी, नागरिकांची सुरक्षा धोक्यात येण्याची भिती निर्माण झाली होती. स्ट्रक्चरल ऑडीटनंतर इमारत धोकादायक असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे संपुर्ण कार्यालय खाली करण्याची वेळ आली. गेल्या तीन वर्षापासून ही कार्यालये खासगी जागांमध्ये भाडे तत्वावर कार्यरत आहेत. ही कार्यालये ठिकठिकाणी विखूरली आहेत. त्याचा नाहक त्रास वंचित घटकांसह कार्यरत कर्मचाऱ्यांना होत आहे.

२००९ ते २०१४ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन या प्रशासकिय इमारतीचे बांधकाम चिंतामणी प्रोजेक्ट प्रा. लि.चे ठेकेदार यांनी निकृष्ट दर्जाचे केले. हे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहित असतानादेखील सार्वजनिक बांधकाम विभागाचे तत्कालीन कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता यांनी बांधकामाकडे दुर्लक्ष केले. निष्काळजीपणा, बेजबाबदारपणा करीत बांधकाम मंजूरी देऊन वेळोवेळी शासनाचे सात कोटी ३६ लाख १६ हजार रुपये ठेकेदाराला देऊन शासनाची दिशाभूल करून फसवणूक केली असल्याची तक्रार अलिबाग पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. सामाजिक न्याय भवन या इमारतीचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याचा ठपका ठेवत समाजकल्याण विभागाने बांधकाम अधिकारी व ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल ही केला आहे.

मात्र नव्याने इमारत बांधण्याच्या भुमिकेकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत आहे. सामाजिक न्याय भवनची जागा पडिक होऊ लागली आहे. गवत व इतर दंश करणाऱ्या प्राण्यांचा वावर वाढू लागला आहे. या इमारतीच्या नुतनीकरणाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने पाठ फिरविल्याने मागास घटकांच्या विकासाला अडकाठी आल्याचे बोलले जात आहे.

गोंधळपाडा येथे उभारण्यात आलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनची इमारत जीर्ण झाली आहे. त्या इमारतीच्या जागी नवीन इमारत बांधण्याची कोणतीही हालचाल सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दिसून येत नाही. ही मोठी चिंतेची बाब आहे.

एका छताखाली योजनांसह विविध शासकिय कामे मागासवर्गीय घटकांची होत असतं. सामाजिक न्याय भवन इमारतीच्या दुरुस्तीसाठी प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. परंतु समाजकल्याण विभागाकडून त्यास नकार देऊन नव्याने इमारत बांधण्याची मागणी केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन दुरुस्तीवर खर्च करण्यापेक्षा अद्ययावत व मजबूत इमारत बांधण्यासाठी प्रयत्न केल्यास नक्कीच मागासवर्गीय घटकाला हक्काचे कार्यालय मिळेल. एकाच छताखाली सर्व योजनांची माहिती मिळण्यास उपलब्धता राहिल असा विश्वास आहे.

लोकसंसद

## भारताने पटकावले पहिले महिला विश्वचषक विजेतेपद!



भारतीय महिला क्रिकेट संघाने नवी मुंबईच्या डी.वाय. पाटील स्टेडियमवर खेळवल्या गेलेल्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघाला पराभवाची धूळ चारली आणि अंतिम विजेतेपद पटकावून ५२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच महिला क्रिकेट विश्वचषकावर आपले नाव कोरले. या अंतिम सामन्यात भारताने २९९ धावांचे ठेवलेले आव्हान दक्षिण आफ्रिकेला पेलवले नाही आणि दक्षिण आफ्रिकेचा संघ सर्वबाद २४६ धावा करून तंबूत परतला. वास्तविक भारतीय महिला क्रिकेट संघ २००५ मध्ये (यजमान; दक्षिण आफ्रिका) पहिल्यांदा विश्वचषक अंतिम फेरीत पोहोचला होता, पण तेव्हा ऑस्ट्रेलियाने भारताला नमवले होते. होता आणि भारताला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. २०१७ मध्ये भारतीय संघ दुसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचला होता (यजमान; इंग्लंड) तेव्हा इंग्लंडने विजेतेपद पटकावून बाजी मारली होती. त्यामुळे महिलांच्या या पहिल्यावहिल्या विश्वचषक अंतिम विजेतेपदाला विशेष झळाळी प्राप्त झाली आहे. भारतीय संघातील सर्वच मुलींनी आपला सर्वोत्कृष्ट खेळ केला. आयसीसीकडून विश्वचषक विजेत्या भारतीय महिला संघाला ३९.७८ कोटी रुपये बक्षीस म्हणून मिळणार आहेत. याशिवाय बीसीसीआयने महिला संघ आणि स्टाफला ५१ कोटी रुपये बक्षीस म्हणून देण्याचा निर्णय घेतला आहे. या पूर्वी ऑस्ट्रेलिया (सात वेळा), इंग्लंड (चार वेळा) आणि न्यूझीलंड (एकदा) या तीन संघांनी महिला एकदिवसीय विश्वचषक जिंकला होता. त्यात आता भारतीय महिला संघाची भर पडली आहे, ती समस्त भारतीयांसाठी सुखावह आणि अभिमानास्पद आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके

महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील शिरढोणे गावात ४ नोव्हेंबर १८४५ रोजी जन्मलेले वासुदेव बळवंत फडके हे ब्रिटिश सरकारविरुद्ध सशस्त्र बंड पुकारणारे पहिले क्रांतिकारक म्हणून ओळखले जातात. १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्यलढ्याच्या अपयशानंतर स्वातंत्र्याच्या महान युद्धाची पहिली ठिणगी वासुदेव बळवंत फडके यांनीच पेटवली होती. वासुदेवांना सशस्त्र क्रांतीचे जनक म्हटले जाते. कारण गुलामगिरीच्या साखळ्या उखडून टाकण्यासाठी त्यांनी आदिवासी तरुणांची अख्खी फौज उभी केली होती. या सैन्याने इंग्रजांच्या नाकी नऊ आणुन सोडले होते. फडके यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांच्या वडिलांनी त्यांना दुकानात काम करण्यास सांगितले. पण त्यांना हे करायचे नव्हते, त्यामुळे त्यांनी वडिलांचे म्हणणे नाकारून ते थेट मुंबईला निघून गेले.

येथे त्यांनी १८७१ मध्ये एका इंग्रजी कंपनीत काम करत असताना जंगलात फौजेच्या सरावाची जागा तयार केली. या काळात ज्योतिबा फुले आणि लोकमान्य टिळक हेही त्यांचे साथीदार होते, असे म्हणतात. फडक्यांनी स्वत:ची फौज उभी करण्यास सुरुवात केली, ज्यात भिल्ल, डांगर, कोळी, रामोशी आदी जातीतील तरुणांचा समावेश होता. वासुदेव यांना सुरुवातीपासूनच कुस्ती आणि घोडेस्वारीची आवड होती. आईच्या मृत्यूने फडक्यांच्या आत क्रांतीची ज्योत अधिक प्रज्वलित झाली, असे म्हणतात. असे काहीसे घडले की, वासुदेव मिलिटरी अकाउंट्स विभागात कारकून म्हणून काम करत असताना त्यांना बातमी मिळाली की त्याची आई खूप आजारी आहे आणि आईला बळवंतला तिच्या मृत्यूपूर्वी भेटायचे आहे. आईची ही अवस्था जाणून बळवंतला धक्काच बसला. त्यांनी लगेच तातडीने इंग्रज अधिकाऱ्याकडे सुट्टी मागितली पण त्या अधिकाऱ्याने सुट्टी देण्यास नकार दिला. दुसऱ्याच दिवशी बळवंत रजा न घेता घरी निघून गेला, मात्र घरी पोहोचण्यापूर्वीच त्यांची आई ही जग सोडून गेली. या परिस्थितीमुळे त्यांना पहिल्यांदाच गुलामगिरी काय असते याची जाणीव झाली. यानंतर त्यांनी या गुलाम गिरीतून मुक्त होण्याचे व्रत घेतले. पुढे त्यांची पुण्यात भेट क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्यासोबत झाल्यानंतर फडके यांच्या मनात त्यांची फौज उभारण्याचा विचार प्रबळ होऊ लागला. साळवे हे समाजसुधारक होते आणि ते दलित तरुणांना कुस्तीचे प्रशिक्षण देत असत. वासुदेवांनी त्यांच्या कडून कुस्तीचे प्रशिक्षण घेतले. वासुदेव यांनी आदिवासीची फौज संघटित करण्याचा प्रयत्न सुरू केला. इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनात फडके यांच्या विषयी इतकी भीती वाढली होती की फडकेनां पकडून देणाऱ्याला ५०,००० रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले. अटक केल्यानंतर डॅनियलने फडकेच्या छातीवर बूट ठेवून विचारले, तुला काय हवे आहे, तेव्हा फडके हसून म्हणाले की, ममला तुझ्याशी एकट्याने तलवारीशी दोन हात करायचे आहेतफ.एका डायरीमुळे गुन्हा सिद्ध झाला. फडके यांच्या विरोधात न्यायालयात एकही साक्षीदार सापडला नसल्याचे सांगितल्या जाते. त्याच्यावरचा गुन्हा हा फक्त त्याच्या एका डायरी लिहलेल्या गोष्टीमुळे सिद्ध झाला होता. १५ वर्षे लिपिकपदावर राहिल्यानंतर त्यांना हिशेब डायरीत लिहिण्याची सवय लागली, असे सांगितले जाते. त्यामुळे दरोड्या दरम्यान लुटलेल्या पैशांचा संपूर्ण हिशोब ते डायरीतच लिहून ठेवायचे. ती डायरी नेमकी डॅनियलचा हाती लागली. डायरीत नोंद असलेल्या गोष्टी वाचून डॅनियल तसेच इंग्रज न्यायाधीश थक्क झाले. वास्तविक कारण इंग्रज फक्त लुटारू मानत होते, तो माणूस इंग्रजांना भारतातून हाकलून देण्याच्या भव्य योजना आखत होता. पुढे त्यांच्यावर मग देशद्रोहाचा खटला चालवला गेला आणि त्यानंतर त्यांना काळयापाण्यांची शिक्षा सुनावली ही शिक्षा भोगण्यासाठी त्यांना अंदमानला पाठवण्यात आले. १७ फेब्रुवारी १८८३ रोजी काळयापाणीच्या शिक्षेदरम्यान देशाच्या या शूर सुपुत्राला वीरगती मिळाली.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**४ नोव्हेंबर**

१) श्री. रविंद्र गजानन लोंढे
विद्यानगर, अलिबाग,
४-११-१९५२

## वाहकाला मारहाण

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

गिरगावमध्ये बेस्ट बसच्या वाहकाला एका प्रवाशाने बेदम मारहाण केली. याप्रकरणी लोकमान्य टिळक मार्ग (एल.टी. मार्ग) पोलिसांनी २९ वर्षीय तरुण प्रवाशाला अटक केली. फिर्यादी केशव रघुनाथ लोखंडे (४१) हे बेस्टमध्ये बस वाहक (कंडक्टर) म्हणून कार्यरत आहेत. रविवारी ते गिरगाव-ठाकुरद्वार रोडवरील फणसवाडी परिसरितून जाणाऱ्या बसमध्ये (एमएच ०१-डीआर ३९२७) कार्यरत होते. बस दुपारी १.३०च्या सुमारास विनय हॉटेलजवळून जात असताना एका तरुणाने क्षुल्लक कारणावरून बस वाहक लोखंडे यांच्याशी वाद घातला. तसेच त्यांचा खाकी गणवेष फाडला. त्यानंतर आरोपीने बसवाहकाला शिवीगाळ करून मारहाण केली.

# हॉस्पिटलचे खासगीकरण करू नये

## • अंधेरी विकास समितीचा आंदोलनाचा इशारा




**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अंधेरी येथील अद्ययावत सेव्हन हिल्स हॉस्पिटल मुंबई महानगरपालिकेने ताब्यात घ्यावे, ही मुंबईकरांची मागणी आहे. हे हॉस्पिटल उद्योगपती मुकेश अंबानी यांना देण्याचा घाट घातला जात आहे; परंतु कोणत्याही परिस्थितीत या हॉस्पिटलचे खासगीकरण करू नये. भाजपा महायुती सरकारने मुंबईकरांच्या मागणीची तात्काळ दखल घ्यावी, यासाठी ६ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता हॉस्पिटलसमोर तीव्र आंदोलन करणार, असा इशारा अंधेरी विकास समितीने दिला आहे.

यासंदर्भात माहिती देताना मुंबईचे माजी उपमहापौर तथा काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेश शर्मा म्हणाले की, अंधेरी येथील सेव्हन हिल्स हॉस्पिटल मुंबई महानगरपालिकेने ताब्यात घ्यावे यासाठी मागील काही महिन्यापासून प्रयत्न केला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बीएमसी व संबंधित यंत्रणांकडे यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केला आहे. परंतु, मुख्यमंत्री वा कोणत्याही यंत्रणांकडून त्याला प्रतिसाद दिला जात नाही, हे गंभीर आहे. भाजपा महायुती सरकारला मुंबईकांच्या आरोग्याची चिंता नाही त्यांना फक्त उद्योगपतींचे हित पहायचे आहे. मुंबई महानगरपालिका आणि राज्य सरकारने सार्वजनिक गरजा लक्षात घेऊन सेव्हन हिल्स हॉस्पिटलच्या जागेत प्रगत वैद्यकीय संशोधन केंद्र आणि शिक्षणासह आंतरराष्ट्रीय दर्जाचे हॉस्पिटल म्हणून विकसित करण्याचा विचार करणे आवश्यक आहे. सेव्हन हिल्स हॉस्पिटलच्या आवारात शिल्लक असलेल्या जागेवर मेडीकल व नर्सिंग कॉलेज सुरु करता येऊ शकते.

सेव्हन हिल्स हॉस्पिटलच्या जागेचा मुळ मालकी हक्क मुंबई महानगरपालिकेचा आहे. महानगरपालिकेने ही जागा सेव्हन हिल्स हॉस्पिटलला लीजवर दिलेली आहे. मुंबई महापालिकेने दुसऱ्या कोणत्याही खासगी कंपनीच्या ताब्यात ती जागा जाऊ न देता स्वतः ताब्यात घेतली तर मुंबईमध्ये एक प्रशस्त, अत्याधुनिक, सर्व सोयीनियुक्त असे महत्वाचे आरोग्य केंद्र बनू शकते. अंधेरीतील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या हॉस्पिटलची बाजार भावानुसार ३००० ते ४००० कोटी रुपये किंमत आहे. परंतु, या जागेकडे व्यापारी दृष्टीकोनातून न पाहता मानवी दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे.

> “मुंबईची वाढती लोकसंख्या लक्षात घेता त्यांच्या आरोग्य सेवांसाठी हे हॉस्पिटल एक मोठी संधी आहे. त्यासाठी सध्या असलेल्या सर्व सुविधांचा विचार करता मुंबई महानगरपालिकेने वेळ न घालवता हे हॉस्पिटल ताब्यात घेऊन मुंबईकरांना अत्याधुनिक आरोग्य सेवा देण्यासाठी पुढाकार घ्यावा.”
>
> **– राजेश शर्मा, काँग्रेसचे उपाध्यक्ष**

# शहापूर-सरळांबे रस्त्याची दुरवस्था

## पावसामुळे पुलावर चिखलाचे सम्राज्य



**। शहापूर । प्रतिनिधी ।**

शहापूर-सरळांबे मार्गावरील तुते गावाजवळील पुलाची अवस्था सध्या अतिशय बिकट झाली आहे. सतत कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे रस्ता खिळखिळा झाला असून अनेक ठिकाणी खड्डेच खड्डे पडले आहेत. या पुलावर चिखलाचे सम्राज्य निर्माण झाले आहे. रस्ता खड्यात गेल्याने वाहनांचे नुकसान तर होत आहेच, शिवाय अपघातही वाढले आहेत. या ठिकाणी एखादी दुर्घटना घडली तर त्याला जबाबदार कोण, असा सवाल नागरिक विचारत आहेत.

शहापूर ते सरळांबे हा रस्ता खड्डेमय झाला आहे. खड्यात रस्ता की रस्त्यात खड्डे अशी या मार्गाची अवस्था झाली असून वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. पुलावरील खड्डे बुजवण्यासाठी विटांचे तुकडे टाकण्यात आले होते. मात्र मुसळधार पावसामुळे विटांच्या तुकड्यांचे रूपांतर चिखलात झाले आहे. त्यामुळे अपघात वाढले आहेत. नवीन रस्ता तर सोडाच पण रस्त्याची डागडुजी करण्याकडे प्रशासनाने कमालीचे दुर्लक्ष केल्याने नागरिकांमध्ये संताप आहे

बामणे, कवडास, तुते, काळेपाडा, अर्जुनली, सरळांबे आणि खुटाडी या गावातील हजारो नागरिक या मार्गावरून दररोज प्रवास करतात. मात्र या मार्गाची चाळण झाली झाल्याने विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक आणि गर्भवती महिलांना प्रवास करताना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेऊन प्रवाशांना दिलासा द्यावा अन्यथा आंदोलन करू, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# आता घरातूनच बदला वीजबिलावरचे नाव

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

वीजग्राहकांना अधिक दर्जेदार जलद आणि घरबसल्या सेवा देण्यासाठी महावितरणकडून आणखी एक महत्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. वीज बिलावरील ग्राहक नाव बदल करण्याच्या ऑनलाईन अर्जांना आता स्वयंचलित मंजुरी देण्यास सुरूवात करून व प्रक्रिया शुल्क भरल्यानंतर ग्राहक नावातील बदलाची कार्यवाही केवळ तीन ते सात दिवसात पूर्ण होणार आहे. यापूर्वी ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी तब्बल एक महिना लागत होता. राज्याचे मुख्यमंत्री व उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार वीजग्राहकांना जलद सेवा मिळावी, या उद्देशाने महावितरणने ही नवकल्पना राबवली आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी यास मंजुरी देत या प्रक्रियेसाठी नवीन ऑनलाईन प्रणाली विकसित करून कार्यान्वित केली आहे. ग्राहकांना www.mahadiscom.in या संकेतस्थळावर किंवा महावितरण मोबाईल ॲप वरून लॉग इन करून अर्ज सादर करता येतो. या उपक्रमामुळे विशेषतः घरगुती आणि लघु ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार आहे.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**

**ई निविदा सूचना क्रमांक ५४/२०२५-२०२६ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा येथील जलशुद्धिकरण केंद्रातील केमिकल हाऊस, फिल्टर रूम आणि पंप हाऊसवर यूपीव्हीसी छप्पर पुरविणे. | ₹ ३१,७६,४५०.०० |
| २ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा येथील सांडपाणी निःसारण योजनेच्या खराब झालेल्या एचडीपीई पाइपलाईनच्या जोडामधील गळती ऑनलाईन पद्धतीने रोखणे. | ₹३८,७०,३४९.०० |
| ३ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती.... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी व स्लॅब ड्रेनसाठी जिओक्रेट सीआर काँक्रीट प्रक्रिया करणे. | ₹४०,३१,०८२.०० |
| ४ | पेण अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. शुद्धजल उदंचन केंद्रातील स्टॅटिक वार जनरेटर (SVG) पॅनेलद्वारे पॉवर फॅक्टर प्रणालीचे बळकटीकरण व सुधारणा करणे. | ₹ ३७,१७,३२६.०० |
| ५ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा पाणीपुरवठा योजने अंतर्गत ई एच बनावटीच्या पूर्ण बोअर इलेक्ट्रोमॅग्नेटिक फ्लोमीटरचे वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹३२,३१,९६५.०० |
| ६ | महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... सन २०२५-२६ या वर्षासाठी जुई, बेबलघर, चिंभवे या सांडपाण्याने बाधित गावांमधील नाल्यावर मातीचे बंधारे घालणे. | ₹१५,७८,९१४.०० |
| ७ | नागोठणे औद्योगिक क्षेत्रासाठी पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती.... मे. आरआयएल लिमिटेड नागोठणे यांच्याकरीता टाकलेल्या १३०० मिमी व्यासाच्या मृदु पोलादी जलवाहिनची वार्षिक तत्वावर दैनंदिन देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹३०,२४,९३७.०० |
| ८ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा व सांडपाणी उदंचन गृहातील विविध प्रकारच्या पंपांची नियमित देखभाल व दुरुस्ती तसेच अचानक बिघाडाची दुरूस्ती करणे तसेच मोटर्सचे बेअरिंग्ज बदलण्यासह रिवाइंडिंग व सर्व्हिसिंग करणे. | ₹३१,५२,२७२.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०४/११/२०२५ ते दिनांक १९/११/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १०/११/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १३/११/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.


पान १ वरून

## अलिबाग-रोहा मार्गावरील साकव कोसळला

त्यामुळे या रस्त्यावरून प्रवाशांना खड्ड्यांतूनच प्रवास करावा लागत आहे.

क्षमता नसताना कंपन्यांची अवजड वाहने या रस्त्यावरून धावत आहेत. त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्याने सोमवारी सायंकाळी वढाव ते खानाव रस्त्यावरील साकव मधोमध तुटला. त्यावेळी दुचाकीवरील महिलेला दुखापत झाली असून, त्यांना खासगी दवाखान्यात उपचारासाठी पाठवण्यात आले.

**आधी पूल बांधा!**

स्वखर्चाने रस्ता बनवून देण्याचे आश्वासन मागील विधानसभा निवडणुकीपूर्वी आमदार दळवी यांनी दिले होते. मात्र, रस्ता अपूर्णच राहिला असून, या रस्त्यावरील पूल सोमवारी सायंकाळी कोसळल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त करत आधी पूल बांधा, नंतर रस्ता बनवा, अशी टीका केली.

**पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करा**

पावसाळ्यापूर्वी स्ट्रक्चरल ऑडिट करून आठ पूल धोकादायक असल्याचे जाहीर करण्यात आले. मात्र, या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट न झाल्याने पूल कोसळल्याची प्रतिक्रिया उमरत आहे.

**आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा ठप्प**

आपत्कालीन परिस्थितीत सज्ज राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी दिले. मात्र, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा ठप्प असल्याचे समोर आले आहे. दुर्घटना घडून कित्येक तास उलटले. परंतु, तहसीलदारांसह अन्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा पोहोचली नाही. स्थानिकांनी पुढाकार घेत रस्त्याच्या दोन्ही मार्गावर उभे राहून पूल कोसळल्याची माहिती दिली. सुरक्षेसाठी दोन्ही बाजूला दोरी बांधली.

अलिबाग-रोहा रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागच्या निष्क्रियतेमुळे आधीच बदनाम झालेला आहे. सदरच्या रस्त्याला असलेल्या पुलाचे ऑडिट झाल्याचा दिंडोरा बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून पिटला होता. मग, हा पूल पडलाय, त्याला जबाबदार कोण? ज्या अधिकाऱ्यांनी या पुलाचे ऑडिट केलेय, त्या संबंधित अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा का दाखल केला जाऊ नये. सर्वसामान्य माणसाचा जीव स्वस्त आहे का?

**- ॲड. राकेश नारायण पाटील, सामाजिक कार्यकर्ते**

**साहेब, याचे श्रेय कोण घेणार?**

अलिबाग-रोहा मार्गाच्या दुरुस्तीचे श्रेय घेण्यासाठी यापूर्वी शिवसेना शिंदे गट आणि भाजपा यांच्यामध्ये अनेकदा जुंपल्याचे सर्वांनीच पाहिले आहे. मग, आता याचे श्रेय कोण घेणार? ही जबाबदारी आमदारांची की सार्वजनिक बांधकाम विभागाची, असा संतापजनक सवाल येथील जनताच आता विचारत आहे.

**प्रशासन निद्रावस्थेत**

साकव दुरुस्ती करण्याबाबत येथील ग्रामस्थांनी अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष वेधले आहे. या साकवाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणीसुद्धा ग्रामस्थांनी केली होती. परंतु, त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळेच ही दुर्घटना घडल्याचे बोलले जात आहे. बांधकाम विभागच या घटनेला जबाबदार असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

## पावसामुळे ‘डेस्टिनेशन वेडिंग’ संकटात

एस.आर.रिसॉर्टचे मालक ओमकार शेवाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पावसाच्या अनियमिततेमुळे अनेक विवाह सोहळे अचानक बंदिस्त हॉलमध्ये हलवावे लागले. त्यामुळे सजावट, ध्वनी व्यवस्था, फोटोशूट आणि अतिथींच्या सोयी-सुविधांमध्ये बदल करावा लागत आहे. आयोजक आणि हॉटेल व्यावसायिकांना यामुळे मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत असून, काही बुकिंग रद्द झाल्याने हॉटेल उद्योगावरही परिणाम झाला आहे.

## आवासच्या यात्रेसाठी एसटी सज्ज

ज्यादा बसेस मागविण्यात आल्या असल्याची माहिती आगार व्यवस्थापक राकेश देवरे यांनी दिली.

आवास येथील नागेश्वर यात्रेच्या निमित्ताने खाद्य पदार्थांसह फुले, हार व खेळण्याची दुकाने सजली जाणार आहेत. त्यांची उभारणी करण्यात आल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. यादरम्यान, आवास येथील नागेश्वराच्या यात्रेला येणाऱ्या भक्तांना वाहतूक कोंडीचा फटका बसू नये, गर्दी होऊ नये, काही गैरप्रकार घडू नये म्हणून मांडवा सागरी पोलिसांमार्फत कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्यात एकूण ३५ पोलीस कर्मचारी, १२ वाहतूक कर्मचारी तसेच वडखळ येथील आरसीपी प्लाटून असणार आहेत. तसेच यात्रांमध्ये अवैध धंदे दिसून आल्यास त्यांच्याविरोधात कारवाई केली जाईल, असे पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे यांनी सांगितले.

## आमदार, खासदारांची शेतकऱ्यांकडे पाठ

एका बाजूला शेतकरी भातपीक उद्ध्वस्त झाल्याने ‘जगावे की मरावे’ या द्विधा मनःस्थितीत आहे. तर, दुसऱ्या बाजूला प्रशासकीय यंत्रणा निष्क्रिय असल्याचे पाहावयास मळित आहे. यादरम्यान शिहूच्या ग्रामसेवकाचे या परिस्थितीत कोणतेही सहकार्य लाभत नाही. ते शेतकऱ्यांना या परिस्थितीत भेटत नसल्याचा आरोप करत शेतकरी तथा शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे माजी शाखा प्रमुख विश्वनाथ गदमळे यांनी केला असून, या ग्रामसेवकावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, येथील शेतकऱ्यांच्या नुकसानीची प्रशासनाकडून पाहणी करून सरसकट नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणीदेखील करण्यात आली आहे.

## सख्ख्या भावांनीच केला जन्मदात्यांचा खून

आंचल दलाल, उपविभागीय पोलीस अधिकारी अभिजीत शिवथरे, महाड उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे, माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी आणि म्हसळ्याचे सपोनि रवींद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या तात्काळ तपासामुळे म्हसळा पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.


**पनवेल महानगरपालिका**

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की.

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | A. T. Anuse, Superitending Engineer CIDCO (Airport), Office - 2nd Floor, Tower No.10, Belapur Station, CBD Belapur, Mumbai 400614. | ३४ सुबाभूळ, ०२ जांभूळ, १० करंज, १० सप्तपर्णी, २३ काजु, ०७ पेरू, ०१ काशिद, ०७ चारकोल ट्री, ०८ साग, ०५ रेन ट्री,०४ देशी बदाम, ०८ पिचकारी, १३ गुलमोहर, ०५ निम, १७ कदंब, १० उंबर, ०१ विलायती चिंच, ०१ वावळ, ०४ मोठी महोगनी,१३ कांचन, ०१ फणस, १३ सोनमोहर, ०१ बोर, ०१ पिंपळ. ०१ चेरी, ०१ काटेसावर, ०२ गुलाबी टॅबेबिया, ०३ बारतोंडी, ०८ बहावा, ०१ ऑस्ट्रेलियन बाबुळ, ०६ आंबा, ०२ भेंडी व ०१ मार्खमीया अशी एकूण २२४ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजा MIDC जवळील मौजे चाल येथे ३४ सुबाभूळ. ०२ जांभूळ, १० करंज. १० सप्तपर्णी, २३ काजु, ०७ पेरू. ०१ काशिद, ०७ चारकोल ट्री, ०८ साग, ०५ रेन ट्री. ०४ देशी बदाम, ०८ पिचकारी, १३ गुलमोहर, ०५ निम, १७ कदंब, १० उंबर, ०१ विलायती चिंच. ०१ वावळ, ०४ मोठी महोगनी. १३ कांचन. ०१ फणस, १३ सोनमोहर, ०१ बोर, ०१ पिंपळ, ०१ चेरी. ०१ काटेसावर. ०२ गुलाबी टॅबेबिया, ०३ बारतोंडी, ०८ बहावा, ०१ ऑस्ट्रेलियन बाबुळ, ०६ आंबा, ०२ भेंडी व ०१ मार्खमीया अशी एकूण २२४ झाडे पनवेल महानगरपालिकेच्या विद्यमान घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाला लागून भविष्यातील विस्तारासाठी प्रस्तावित अतिरिक्त भूखंडाभोवती परिघीय मार्ग व S.W.Drain चे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर करावयात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(स्वरूप खारगे)**
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.-PMC-PARK/ 576/2025-PTAD


# निवडक



## भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त

**शहापूर :** भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याने २२ ऑगस्ट रोजी तीन न्यायमूर्तींच्या पीठाने भटक्या कुत्र्यांवर नियमांनुसार उपचार, नसबंदी आणि लसीकरणानंतर कुत्र्यांना त्याच परिसरात सोडावे असे स्पष्ट केले होते. त्यातच याबाबत संबंधित सचिवांना समन्स बजावल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांना जाग आली आहे. त्यांनी भटक्या कुत्र्यांवर लसीकरण मोहीम सुरू केली असल्याचे समजते. त्यानुसार शहापूर नगरपंचायतीनेदेखील रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम सुरू केली आहे. शहापूर नगरपंचायत हद्दीत सुमारे दोनशेहून अधिक भटक्या कुत्र्यांची संख्या असून आतापर्यंत सुमारे शंभरच्या आसपास श्वानांचे लसीकरण पूर्ण करण्यात आले असल्याची माहिती नगरपंचायतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवराज गायकवाड यांनी दिली. परिसरातील भटक्या तसेच घरगुती श्वानांना रेबीज लस देण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन नगरपंचायतीकडून करण्यात आले आहे.



## कोकणात सीगल पक्ष्यांचे आगमन

**दापोली :** परतीच्या पावसाच्या वाढलेल्या मुक्कामामुळे साऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले होते. मात्र, थंडीची चाहूल देणारे विदेशी सीगल पक्षी दापोलीच्या किनाऱ्यावर दिसू लागले आहेत. त्यामुळे दापोलीकरांना काहीसा दिलासा मिळाला आहे. सायबेरिया, रशिया आणि उत्तरेकडील बर्फाच्छादित प्रदेशातून तब्बल पाच ते सहा हजार किलोमीटरचा प्रवास करीत हे पक्षी दरवर्षी भारतात दाखल होतात. दरवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या सुमारास ते कोकण किनाऱ्याकडे झेप घेतात आणि थंडीच्या हंगामात स्थिरावतात. रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णै बंदर, दापोली, गणपतीपुळे, आरे-वारे यांसारख्या किनाऱ्यांवर सध्या या पक्ष्यांचे थवे मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहेत. समुद्रावर उडणाऱ्या या पांढऱ्या पंखांच्या झुंडी, वाऱ्याशी खेळणारी त्यांची उडाण आणि त्यांच्या किलबिलाटाने साऱ्या किनारपट्टीवर थंडीची चाहूल निर्माण झाली आहे. सिगल्सच्या आगमनामुळे कोकणात दाखल झालेल्या पर्यटकांनाही कुतूहल वाटू लागले आहे.

## ड्रग्जतस्करीतील सूत्रधाराला दुबईत अटक


**मुंबई :** दुबईत बसून देशातील विविध राज्यांमध्ये ड्रग्जचे उत्पादन करून तस्करीचे नेटवर्क चालवणाऱ्याला हिंदुस्थानच्या तपास यंत्रणांनी बेड्या ठोकल्या. सलीम शेख ऊर्फ शेरा असे त्याचे नाव असून त्याला दुबई येथून अटक केली. त्याला पुढील तपासासाठी घाटकोपर अमली पदार्थविरोधी पथकाच्या ताब्यात देण्यात आले आहे.



त्याने तीन वर्षांत तीन एमडीचे कारखाने तयार केले होते. मुंबई सेंट्रल पूर्व येथे काही जण एमडी ड्रग्ज विक्रीसाठी येणार असल्याची माहिती घाटकोपर युनिटला मिळाली. त्या माहितीची शहानिशा करून तीन वर्षांपूर्वी पोलिसांनी मोहम्मद शफीला अटक केली होती. त्याच्याकडून ९९५ ग्रॅम एमडी आणि सवा लाख रुपये जप्त केले होते. या गुह्यात पोलिसांनी दोघांना अटक केली होती. त्याच्या चौकशीत सलमानचे नावसमोर आले होते. चौकशीदरम्यान सलमान हा मुख्य सूत्रधार असल्याचे उघड झाले. सलमान हा दुबईतून ड्रग्जचे रॅकेट चालवत होता. त्याच्या अटकेसाठी घाटकोपर अमली पदार्थविरोधी पथकाच्या अधिकाऱ्याने विशेष मोहीम हाती घेतली. तो दुबई येथे राहत असल्याने त्याच्या विरोधात रेड कॉर्नर नोटीस जारी केली. त्यानंतर त्याला दुबई येथे अटक करून हिंदुस्थानात आणण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर येताच त्याला पुढील तपासासाठी घाटकोपर युनिटकडे सोपवण्यात आले.

## पाकनिर्णय स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन

**अलिबाग :** कालनिर्णयतर्फे वाचकांसाठी पाकनिर्णय-२०२६ ही पाककृती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून, या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा, तसेच कालनिर्णय सांस्कृतिक दिवाळी अंकाचा प्रकाशन समारंभ आणि आठवणीतील गाणी या सुरेल मैफलचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा शुक्रवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता यशवंत नाट्यमंदिर, १२२ - डी, जे. के. सावंतमार्ग, जोशीवाडी, माटुंगा (प.), मुंबई येथे पार पडणार आहे. या सोहळ्याला पाककला स्पर्धेचे परीक्षक मोहसिना मुकादम, शेफ अनिश देशमुख आणि आशालता पाटील यांची उपस्थिती असणार आहे. तसेच या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध लेखक आणि कवी डॉ. नीतीन रिंढे उपस्थित राहणार आहेत. तरी या सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन कालनिर्णयचे संपादक, प्रकाशक जयराज साळगावकर यांनी केले आहे.



## कोकणात जाणाऱ्या रेल्वे प्रवाशांना दिलासा

**मुंबई :** कोकणात प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी आता मोठा दिलासा मिळाला आहे. कोकण रेल्वे मार्गावर धावणाऱ्या आठ मेल-एक्सप्रेस गाड्यांना सिंधुदुर्गनगरी आणि कणकवली या रेल्वे स्थानकांवर थांबा देण्याचा निर्णय रेल्वे मंडळाने घेतला आहे. रविवारपासून या निर्णयाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी सुरू झाली असून, गर्दीच्या काळात कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना यामुळे मोठी सुविधा मिळणार आहे. कोकण रेल्वे मार्गावरील काही प्रमुख गाड्यांना आतापर्यंत कोकणातील मुख्य स्थानकांवर थांबा नव्हता. त्यामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर कोकणातील प्रवासी आणि विविध प्रवासी संघटनांनी सातत्याने लोकप्रतिनिधीमार्फत रेल्वे प्रशासनाकडे थांबे वाढवण्याची मागणी केली होती.

# श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याची दुरावस्था

## ■ विकासकामे किनाऱ्यासाठी ठरते घातक; ब्ल्यू फ्लॅग पायलट मानांकन प्राप्त

| श्रीवर्धन | समीर रिसबूड |



ब्ल्यू फ्लॅग पायलट मानांकन यामुळे श्रीवर्धन समुद्र किनारा जागतिक पर्यटन नकाशावर पोहोचणार आहे, ज्यामुळे स्थानिक पर्यटन आणि रोजगाराला चालना मिळेल.असा गवगवा करण्यात येत आहे. परंतु, सद्यस्थितीत श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावर बांधण्यात आलेल्या सुशोभिकरणातील बंधाऱ्याची लाटांनी दुरावस्था झाली आहे. आलेला पर्यटक बंधाऱ्यातील विखुरलेल्या दगडातून वाट शोधत किनाऱ्याकडे जातांना दिसतात.

श्रीवर्धन शहराला अडीच किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. २००९ साली साधारण दीड किलोमीटर लांबीच्या अंतरावर धुप प्रतिबंधक बंधारा बांधण्यात आला व बंधाऱ्यावर सुशोभिकरण करण्यात आले. २००९ सालापासून २०२४ सालापर्यंत सुस्थितीत असलेला धुपप्रतिबंधक बंधारा या जीवनाबंदर व मुळगाव कोळीवाडा येथे सुरू असणाऱ्या विकासकामांचा दुष्परिणाम ठरू लागला आहे.

सद्यस्थितीत बंधाऱ्यावरून किनाऱ्याकडे जाणारा रॅम्प व पायऱ्यांची अजस्त्र लाटांनी दुरावस्था झाली आहे.

जीवनाबंदर येथे सुरू असलेल्या अत्याधुनिक जेटीचे बांधकाम व मुळगाव कोळीवाडा येथील होत असलेला ग्रोयांन्स पद्धतीचा बंधारा, या विकासकामांसाठी एकरोवारी जागेत दगड व मातीचा भराव टाकण्यात येतोय.या भरावामुळे जीवनाबंदर येथील समुद्राच्या पाण्याने व मुळगाव कोळीवाडा येथील काळींजे खाडीच्या पाण्याने दिशा बदलली आहे.श्रीवर्धनची भौगोलिक रचना ही अशी आहे की, दोन डोंगरांच्या मध्ये शहर वसलेले आहे. भरावामुळे पाणी इतरत्र जात नसल्याने समुद्राच्या लाटा या अडीच किलोमीटर लांबीच्या किनाऱ्यावर धडकत आहेत. या लाटांमुळे दीड किलोमीटर लांबीचा धुपप्रतिबंधक बंधारा उध्वस्त होत आहे असून बंधारा लगत असलेल्या रॅम्प व पायर्यांची दुरावस्था झाली आहे तसेच सुरूची झाडे ही लाटांमुळे भुईसपाट झाली आहेत.

### संशोधनाचा विषय

समुद्रकिनाऱ्यावरील स्वच्छता, समुद्राच्या पाण्याची गुणवत्ता, पर्यटकांचे संरक्षण तसेच निसर्ग व पर्यावरण रक्षण या अशा ३३ निकषांमधून पास झालेल्यांना दर्जा दिला जातो. केंद्रीय पर्यावरण हवामान तसेच पर्यटन खात्याच्या संयुक्त उपक्रमांतर्गत मूल्यमापन करण्यात आल्यानंतर श्रीवर्धन समुद्र किनाऱ्याला 'ब्ल्यू फ्लॅग' दर्जा देण्यात आला आहे. वर्षभर पाहणी केल्यानंतर मानांकनाला अंतिम स्वरूप मिळणार आहे. 'ब्ल्यू फ्लॅग' मानांकना नंतर समुद्रकिनाऱ्यांवर जागतिक दर्जाच्या सुविधा उभारण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी मिळतो.

### मानांकनाचा नक्की फायदा कोणाला?

श्रीवर्धन समुद्र किनाऱ्याला 'ब्ल्यू फ्लॅग' मानांकन मिळाले आहे.यामुळे पर्यटनात मोठी वाढ अपेक्षित आहे. आंतरराष्ट्रीय दर्जा मिळाल्याने विदेशी पर्यटक येतील आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. मात्र, या विकासाचा फायदा श्रीवर्धन येथील पर्यटन व्यवसायीकांना होणार की मुंबैकर व पुणेकर येथील धनिकाना, श्रीवर्धन येथे दिवसेंदिवस जमिन खरेदीचे व्यवहार वाढत असून स्थानिक पर्यटन व्यवसायीक बेरोजगार होणार आहे.

# आगरी समाज संस्थेतर्फे बाल संस्कार वर्ग सुरु

| अलिबाग | प्रतिनिधी |



आगरी समाज संस्था, अलिबाग यांच्या वतीने मन:शक्ती प्रयोग केंद्र, लोणावळा, शाखा-अलिबाग यांच्या सहकार्याने विनामूल्य बाल संस्कार वर्ग या उपक्रमाचा शुभारंभ उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश समाजातील बालकांमध्ये चारित्र्य, आत्मविश्वास, संस्कार आणि व्यक्तीमत्व विकास घडविणे हा आहे.

संस्कार वर्ग गावदेवी मंदिर, रामनाथ तळ्याजवळ, अलिबाग येथे दर रविवारी सकाळी ९.०० ते १०.३० या वेळेत घेतला जाणार असून, ५ ते १२ वर्षे वयोगटातील मुलांसाठी पूर्णपणे विनामूल्य आहे.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून आगरी समाज संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक अनंत म्हात्रे, शशिकांत गुरव, राकेश चौलकर, संदीप बाम, विनय आपटे, रविंद्र घरत सुप्रिया ठाकूर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन आगरी समाज संस्थेच्या वतीने उपाध्यक्ष सुनील तांबडकर, प्रभाकर ठाकूर, उदय म्हात्रे, मनोहर पाटील, राजेंद्र पाटील, श्रेयस ठाकूर यांनी केले. या वेळी ग्रामस्थ रामनाथ, पालक व बालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या प्रसंगी संदीप बाम यांनी मन:शक्ती प्रयोग केंद्राच्या विविध उपक्रमांची माहिती देत मुलांमध्ये सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि एकाग्रता विकसित करण्याचे महत्व अधोरेखित केले.

सुप्रिया ठाकूर यांनी बालसंस्कार वर्गाचे उद्दिष्ट व महत्व सांगत पालकांना मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आभार सुप्रिया ठाकूर यांनी मानले.

# कुटुंबांना मिळाली हक्काची जागा

| दिघी | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यातील प्रसिध्द दिवेआगर पर्यटन ठिकाणी सरकारी जागेवरती अतिक्रमण केलेल्या ४४ कुटुंबांना शासनाने सदर अतिक्रमण नियमानुकूल करून दिलासा दिला आहे. महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या उपस्थितीत अतिक्रमण धारक कुटुंबियांना सनदची वाटप करण्यात आले.

सदर महाराजस्व अभियाना अंतर्गत श्रीवर्धन प्रांताधिकारी महेश पाटील, तहसीलदार महेंद्र वाकलेकर यांनी श्रीवर्धन तालुक्यातील मौजे दिवेआगर तसेच इतर गावातील सरकारी जमिनीवरील अतिक्रमणधारक नागरिक यांच्याशी संवाद साधत अतिक्रमण केलेल्या जागा शासन नियमानुसार नियमानुकूल करण्या संदर्भात ठोस भूमिका घेतली.

रविवारी ब्राह्मण हॉल दिवेआगर येथील सभागृहात मंत्री तटकरे यांच्या हस्ते जागेच्या सनदची वाटप करण्यात आली.

सदरच्या कार्यक्रमात जिवंत सातबारा मोहीम अंतर्गत सातबारा, शेतकरीकार्ड व प्रशासनातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सन्मानपत्र देण्यात आले. कार्यक्रमासाठी मोहम्मद मेमन, उदय बापट, नंदू पाटील, वसीम फकजी, लालाभाई जोशी, सुचिन किर, सिद्धेश कोसबे व इतर मान्यवर आणि लाभार्थी नागरिक उपस्थित होते





# दूध कलेक्शन सेंटरचे उद्घाटन

| महाड | प्रतिनिधी |

चोचिंदे येथील दूध कलेक्शन सेंटरच्या खडीपट्ट्यातील दुसऱ्या वास्तूचा शुभारंभ वाशिष्टी डेअरी संस्थापक प्रशांत यादव यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी प्रमुख अतिथी वाशिष्टी डेअरी मुख्य कार्यवाहक साधना यादव, महेश खेतले, प्रदीप मगदूम, हर्षद चाळके, चंद्रकांत धोंडगे, सुरेश धोंडगे, संतोष फाटक, सोनाली अहिरे, रघुनाथ भागवत, गणपत मालप, नितीन कदम, गणेश कुर्डूनकर, अंकुश नवले, जया निवाते, राज राणे, संदीप राणे, रमेश धाडसे, जितेंद्र शिंदे, दत्ताराम भावे, संजय जंगम, एकनाथ नवले, बाळकृष्ण खोपकर, आरिफ कादिर, अशोक पाटील, प्रदीप कदम, उतेकर यांच्यासह विभागातील दुग्ध व्यवसाय शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बळीराजा सरासरी मदतीच्या प्रतिक्षेत

| बोर्ली पंचतन | प्रतिनिधी |



बळीराजाने आपल्या घामाच्या शिंपणाने पिकवलेले सोनं काढणीसाठी तयार झाल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद होता. परंतु परतीच्या पावसाने धुमाकूळ घातल्याने भातशेती पूर्णपणे आडवी झाली असून शेतकऱ्यांच्या मेहनतीवर अक्षरशः पाणी फिरले आहे. पावसामुळे तयार झालेल्या भाताला कोंब आले असून अनेक ठिकणी भातशेती पूर्णता कुजली आहे. डोंगर उतारावरील नाचणीची सुद्धा हीच अवस्था झाल्याने पीक काढणीच्या महत्वाच्या टप्यात झालेल्या अवकाळीच्या अस्मानी संकटाने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला असून त्यांच्या डोळ्यात पाणी आणले आहे. भात पीक पाण्यात भिजल्याने त्यापासून मिळणारा पेंढासुध्दा खराब झाल्याने उन्हाळ्यात गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न सुद्धा निर्माण होणार आहे. कोकणची अर्थव्यवस्था भातशेती, आंबा,मासेमारी आणि पर्यटन यावर प्रामुख्याने अवलंबून असते मात्र, यंदा ऑक्टोबर महिन्यात पडलेल्या मुसळधार पावसाचा या व्यवसायांना चांगलाच फटका बसला असून नोव्हेंबर महिना उगवला तरी अजूनही बरसणाऱ्या पावसामुळे भातशेती बरोबरच आंबा, काजू बागायतदारांचीही चिंता वाढली आहे. श्रीवर्धन तालुक्यामध्ये अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहाय्यक व ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मार्फत प्रत्यक्ष शेतात जाऊन पंचनामे करण्याचे आदेश तहसीलदार महेंद्र वाकलेकर यांनी दिले आहेत.

मात्र, एका अधिकाऱ्याकडे दहा-दहा गावांचा पंचनामा करण्याची जबाबदारी असल्याने संपुर्ण पंचनामे वेळेत पूर्ण न झाल्यास नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळेल की नाही असा प्रश्न शेतकऱ्यांकडून विचारला जात आहे. शासनाने या अस्मानी संकटाच्या पार्श्वभूमीवर तातडीने मदतीची पावलं उचलण्याची गरज आहे अन्यथा कोकणातील असंख्य शेतकरी पुढील काही वर्ष आर्थिक संकटात सापडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# 'पैसे डबलच्या आमिषाला बळी पडू नका'

| उरण | प्रतिनिधी |

उरण परिसरात पुन्हा एकदा 'पैसे डबल' करण्याच्या नावाखाली सर्वसामान्य जनतेची फसवणूक करणारे प्रकार सुरू झाले असल्याचे समोर आले आहे. उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांनी यासंदर्भात नागरिकांना जागरूक राहण्याचे आवाहन केले असून, अशा प्रकारच्या आमिषाला बळी पडू नका, मेहनतीचा पैसा या फसवणुक्यांच्या खिशात जाऊ देऊ नका, असा इशाराही दिला आहे.

काही वर्षांपूर्वी उरणमध्ये पैसे डबल करण्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याच्या घटना समोर आल्या होत्या. अनेक नागरिकांचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत. तरी देखील आजही अशा फसवणुकीच्या चेन पद्धती उरणसह परिसरात कार्यरत असल्याचे दिसत आहे.

या पार्श्वभूमीवर उरण पोलीस ठाण्याच्या वतीने सारडे गावात जनजागृती बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याबाबत वपोनि हनीफ मुलानी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ही फसवणूक चेनसिस्टीमच्या माध्यमातून केली जाते. सुरुवातीला थोडा परतावा देऊन लोकांचा विश्वास जिंकला जातो, मात्र त्यानंतर लाखो रुपये बुडवले जातात. जोपर्यंत पैसे मिळतात तोवर सर्वजण शांत असतात, पण पैसे थांबताच तक्रारी सुरू होतात. मुलानी यांनी यावेळी स्पष्टपणे सांगितले की, अशा फसवणुकीचा व्यवसाय करणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत पोलीस ठाण्याकडून थारा मिळणार नाही. तसेच, नागरिकांनी संशयास्पद प्रकार त्वरित पोलिसांना कळवावे असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# हेमंत तांबोळींचे शिष्यांकडून गुरुपूजन



| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील प्रसिद्ध पखवाज वादक हेमंत तांबोळी यांचे गुरुपूजन शिष्यांकडून करण्यात आले.

तांबोळी नेरळ कशेळे भागातील स्थानिक तरुणांना पखवाज वादनाचे प्रशिक्षण देत असतात. त्यासाठी ते कोणत्याही विद्यार्थ्यांकडून मानधन स्वीकारत नाहीत. त्यामुळे दरवर्षी गुरुपूजन कार्यक्रम आयोजित करून आपल्या गुरुप्रती आदरभाव व्यक्त करीत असतात. याप्रसंगी कर्जत व अंबरनाथ तालुक्यातील कलावंत व मित्र परिवार उपस्थित होते.

## उष्णतेऐवजी वातावरणात गारवा, दमटपणा | ऑक्टोबर महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस

# सततच्या पावसामुळे ऑक्टोबर हिट गायब

| माणगाव | प्रतिनिधी |

ऑक्टोबर महिना उजाडला तरी अजूनही राज्यातून पावसाने माघार घेतली नाहीये. सप्टेंबर महिन्यात पावसाने राज्यासह देशभरात हाहकार माजवला. अनेक ठिकाणी पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली होती. यंदा पावसाने आपला मुक्काम लांबवल्याने ऑक्टोबर महिन्यातही पावसाने दाणादाण उडवून दिली होती. आता हवामान विभागाने ऑक्टोबर महिन्याचा अंदाजही वर्तवला आहे.



हवामान खात्याने जारी केलेल्या अंदाजानुसार, यंदा ऑक्टोबर हिटमध्ये उन्हाचे चटके जाणवणार नाही. तर या महिन्यातही सरासरीच्या तुलनेत अधिक पावासाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे.

यंदा राज्यभरात ऑक्टोबर महिन्यात सरासरीच्या तुलनेत अधिक पावासाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे कोकण, मध्य महाराष्ट्रात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडू शकतो, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने सांगितले आहे.

ऑक्टोबर महिना म्हटला की, प्रखर ऊन, उकाडा आणि ऑक्टोबर हिटची चर्चा नेहमीच होते. गेल्यावर्षी याच महिन्यात तापमानाचा पारा ३८ अंशावर गेला होता. यंदा परिस्थिती पूर्णपणे उलटी दिसत आहे. राज्यात यंदा ऑक्टोबर महिनाभर ढगाळ वातावरण आणि दररोज पडणाऱ्या पावसामुळे ऑक्टोबर हिट पूर्णपणे गायब झाली आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार, मागील काही वर्षांच्या तुलनेत यंदा ऑक्टोबर महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला आहे. अनेक भागात अजूनही अवकाळी पावसाचे सत्र सुरू आहे. दिवसाढवळ्या ऊन निघाले तरी काही तासांतच काळे ढग दाटून येतात आणि पाऊस बरसतो. त्यामुळे उष्णतेऐवजी वातावरणात गारवा आणि दमटपणा वाढला आहे.

पावसाने हवामानाचे गणित बिघडले आहे. साधारणपणे सप्टेंबर अखेर पावसाचे प्रमाण घटते आणि ऑक्टोबरमध्ये तापमान वाढून ऑक्टोबर हिट जाणवते. परंतु यंदा पावसाने संपूर्ण महिन्यात हजेरी लावल्याने दिवसाचाही तापमानाचा पारा ३० अंशांच्या आसपासच राहिला आहे.

सततच्या पावसामुळे काही भागात काढणीस आलेल्या पिकांचे नुकसान झाले आहे. भात या पिकांची कापणी होत नसल्याने शेतीवर मोठे संकट आले आहे.

सततच्या पावसामुळे रब्बी हंगामातील लागवड लांबणीवर गेली आहे. ऑक्टोबर महिन्यातील तीव्र उन्हाळ्यामुळे पावसानंतर जमीन कोरडी होऊन रब्बी हंगामाच्या तयारीसाठी शेतकऱ्यांना पुरेसा वेळ मिळत होता मात्र पाऊस लांबल्याने ऑक्टोबर हिट गायब झाली असून हिवाळा लांबणीवर गेल्यामुळे ऑक्टोबर हिटमध्ये उन्हाचे चटके जाणवणार नाही

### उन्हाचे चटके जाणवणारच नाहीत?

ऑक्टोबर महिन्यात साधारणपणे उन्हाची तीव्रता जास्त असते. या महिन्यात उन्हामुळे काहिली होत असते. तापमान जास्त असल्याने ऑक्टोबर हिटचा तापही अधिक जाणवतो. मात्र यंदा नागरिकांना ऑक्टोबर हिटचा ताप सहन करावा लागणार नाही. नेहमीप्रमाणे जाणवणारे उष्णतेचे चटके यंदा ऑक्टोबरमध्ये टळणार आहेत. त्यामुळं एकीकडे नागरिकांची उन्हाच्या काहिलीपासून सुटका होणार आहे. तर, एकीकडे निसर्गाचे चक्र फिरल्याची चर्चा होताना दिसत आहे.

## निवडक



### श्रीकांत शांताराम पाटील सेवानिवृत्त

**सोगाव** : अलिबाग तालुक्यातील रायगड बाजार चोंढी शाखेचे कर्मचारी श्रीकांत शांताराम पाटील हे वयाच्या ५८ व्या वर्षी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा रायगड बाजार संस्थेच्या वतीने निरोप देण्यात आला. पाटील यांनी सन १९९१ साली आपल्या कारकिर्दीची सुरुवात रायगड बाजार शिरवली शाखेमधून केली. यावेळी त्यांनी मेकॅनिक, सुरक्षा रक्षक, गोडाऊन क्लार्क, मॅनेजर असिस्टंट अशा विविध प्रकारच्या ठिकाणी त्यांनी कार्य करीत ३१ वर्षे सेवा बजावल्यानतंर शुक्रवार (दि.३१) ऑक्टोबर रोजी त्यांना अलिबाग येथील रायगड बाजारच्या मुख्यालयात त्यांचा सेवानिवृत्त निमित्ताने निरोप देण्यात आला. या सेवानिवृत्त कार्यक्रमाला रायगड बाजार व्यवस्थापक अधिकारी दिलीप पाटील, प्रदीप नाईक, मुकुद राऊळ, मंगेश पाटील, रेश्मी शेळके, चक्रपाणी पाटील, ज्ञानेश्वर राऊत, निहार ढवळे व इतर अनेक सेवक व कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.



### धाकट्या पंढरीत भक्तांची मांदीयाळी

**खोपोली** : महाराष्ट्रातील वारकऱ्यांचे आराध्यदैवत व जगतगुरु संत तुकाराम महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या व महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री विठोबा देवस्थान ताकई येथे कार्तिकी एकादशी दिवशी विठूरायाच्या गजराने दुमदुमून गेली असून पुढील पंधरा दिवस यात्रा सुरू राहणार आहे.यंदा श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या महापूजा माजी नगराध्यक्ष डॉ. सुनिल पाटील व कविता पाटील सपत्निक केली. दर वर्षाप्रमाणे यंदा धाकटी पंढरी ताकई येथे कार्तिक एकादशीच्या आदल्या दिवशी ताकई गावात पांडूरंगाच्या पादुका व मुकुटाची पालखीचा मान गावातील अनंता गोविंद पाटील यांच्या कुटूंबाला मिळाला आहे. पालखी पहाटे २ वाजता गावाला प्रदर्शना घालून मंदीरात प्रस्थान केले. त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणीची महापूजा डॉ. पाटील यांनी सपत्निक केली आहे. कार्तिकी एकादशी म्हणजे वैष्णवांसाठी विशेष सोहळ्याचा दिवस. विठ्ठल-विठ्ठल जय हरी विठ्ठलाच्या गजरात भक्तांची पाऊलं धाकटी पंढरीकडे वळली असून कर्जत खालापूरात दिंड्या आल्या आहेत. मुसळधार पावसातही सकाळपासून दर्शनासाठी भाविकांची रांगा लागल्या होत्या. याप्रसंगी देवस्थान कमिटी अध्यक्ष अनंता पाटील, उपाध्यक्ष जयवंत पाटील, कृष्णा पाटील उपस्थित होते.

### प्रा. राजेंद्र जाधव यांना पुरस्कार

**खरोशी** : पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्रायव्हेट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज पेण जि रायगड येथील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक प्रा. राजेंद्र जाधव यांना सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सेकंडरी स्कूल एम्प्लॉईज को-ऑ. क्रेडिट सोसायटी लि. मुंबई या संस्थेच्या वतीने पद्मभूषण डॉ कर्मवीर भाऊराव पाटील राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सेकंडरीचे अध्यक्ष डॉ चंद्रकांत पाटील,



सतिश मराठे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. प्रा. जाधव हे बालभारतीच्या अभ्यासक्रम विकसन समितीवर कार्यरत असून SCERT च्या विविध उपक्रमात राज्य स्तरावर सहभाग घेतलेला आहे. प्रा. जाधव यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत सेकंडरी स्कूल एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड मुंबई या संस्थेने त्यांना सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात पद्मभूषण डॉ कर्मवीर भाऊराव पाटील आदर्श शिक्षक राज्य स्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले.त्यांना मिळालेल्या यशाबद्दल पेण एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, बाळासाहेब जोशी व सर्व संचालक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- कामासाठी माणसे पाहिजेत. अलिबाग परिसरातील गरजूनी वयोगट २८ ते ४० १) मोटारसायकल डिलिव्हरी अलिबाग ते पेण अलिबाग ते मुरुड. २) मोबाईल विक्रीसाठी सेल्समन स्वत:ची बाईक लायसन्स गरजेचा. ३) व लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर ४) पार्ट किंवा फुल टाईम, ५) फोरव्हीलरमध्ये मदत करणारा. मो. ८८८८२२०२२१
- दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१
- अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स, वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत. मो. ९९२३५०६७७९/८३९०४५५५६५/७५०६३२९९११
- अकाउंटट पाहिजे- पात्रता B com, Tally अनुभव ५ वर्षे ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार - २५००० महिना Contanct - 9823585321
- "जन्नावार हॉस्पीटल" अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No : 7798034509
- ऑफिस वर्कसाठी मुलगा/मुलगी पाहिजे. वेळ : १० ते ६ वेतन : ५०००/- कॉम्प्युटर नॉलेज व मराठी टायपिंग आवश्यक. धुमाळ हॉस्पिटल जवळ, चेंढरे-अलिबाग. संपर्क : ७२६३८८५७९०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकविस) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चौरस मिटर | रुपये | पैसे |
| १) जयेश चंद्रकांत पंड्या,<br>२) तरुलता चंद्रकांत पंड्या,<br>३) निला रमेश भट,<br>४) सिमा जयेश पंड्या | ८५ | १६ | ७७०. ०० | ७७ | ०० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/-

कार्यालयीन पत्ता :- शॉप नं. २, तळमजला, साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ, नेरळ पूर्व, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१

**ॲड. नितीन अर्जुन क्षिरसागर**
दिनांक :- ०४/११/२०२५
मो. नं. ९३७२९६४६६५

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र अर्ज २७८/२०२५

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्री. खलिक अब्दुल रऊफ हरझुक, — अर्जदार
रा. ५०४, मगनस रेसिडन्सी प्लॉट नं. १०६, सेक्टर
५० सीवुड्स नवी मुंबई ठाणे

विरुद्ध

मुख्याधिकारी
नगर परिषद मुरूड-जंजिरा — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. १४/०२/१९५५ रोजी मौजे मुरूड, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आंबोली, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. १४/०२/१९५५ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक १२/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म- मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.०३/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

---

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक श्री तेजस प्रकाश पाटील यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. (चौ.मी.) | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| कुरूळ<br>ता.अलिबाग<br>जि.रायगड | ७१/४/अ | जिरायत ०-१८-७०<br>वरकस ०-०५-१०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-२४-३० | ४.७५ |
| कुरूळ<br>ता.अलिबाग<br>जि.रायगड | ७२ | ०-०५-०० | ०.१२ |
| कुरूळ<br>ता.अलिबाग<br>जि.रायगड | ७१/४/ब/५ | एकूण ०-३३-१०<br>या क्षेत्रापैकी ०-०४-१०<br>पोख. ०-००-३०<br>एकुण ०-०४-४० | ०.९९ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : ०३/११/२०२५

सही
**ॲड. ज्योती आर्केश पाटील**
रा २०४, कृष्ण मंदिर, मारूती नाका,
अलिबाग बीच रोड,
ता.अलिबाग, जि.रायगड मो.नं.९४२०६५१७३३

---

## जाहीर नोटीस

अर्जदारा तर्फे वकील ॲड. कौस्तुभ पवार

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो., यांचे न्यायालयात**

दिवाणी चौ. अर्ज क्र. ३/२०२५
ने. ता./ / २०२५
नि. /

श्रीमती. संजिवनी मुकुंद दातार
वय ७० वर्षे, व्यवसाय-गृहिणी व सेवानिवृत्त
पॅन नं. AAHPD6350P
आधार नं. ३३८१ २१८३ २२४८ — अर्जदार
रा.फ्लॅट नं.२०३, डी विंग, राजहंस
डॅफोडील्स सह गृह संस्था मर्या.,
गोंधळपाडा, ता.अलिबाग,
जि.रायगड, महाराष्ट्र ४००२०१

विरूद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

कै. मुकुंद कृष्णा दातार यांचे दि.०९/०२/२०२२ रोजी आयुष्य व्यसन मुक्ती केंद्र, पुणे, महाराष्ट्र येथे वृद्धापकाळाने निधन झाले. कै. मुकुंद कृष्णा दातार यांना त्यांच्या पश्चात अर्जदार म्हणजेच त्यांच्या पत्नी श्रीमती.संजीवनी मुकुंद दातार ह्या एकच कायदेशीर वारस आहेत. सदरहू अर्जदार व्यतिरिक्त कै.मुकुंद कृष्णा दातार यांना अन्य कुणीही कायदेशीर वारस नाही.

कै. मुकुंद कृष्णा दातार यांचे निधनानंतर सदरहू अर्जात नमुद केलेली मिळकत कै. मुकुंद कृष्णा दातार यांचे नाव कमी करून अर्जदार यांच्या नावाची नोंद होण्यासाठी अर्जदार हे पेण येथे आर.टी.ओ कार्यालयात गेले असता त्यांनी मे. कोर्टाकडून तसा वारस दाखला आणणे आवश्यक असल्याचे कळविले. त्यामुळे अर्जदार हेच कै. मुकुंद कृष्णा दातार यांचे खरे व कायदेशीर वारसदार असलेबाबतचा दाखला मे. कोर्टातून मिळावा म्हणून सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

वर नमुद केलेल्या मिळकती संदर्भात अर्जदार यांनी वारस दाखल्याकरीता मे. कोर्टात अर्ज केला आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता दिनांक /२०२५ पर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. कोर्टात हजर रहावे व आपली हरकत कळवावी. विहीत मुदतीत कोणीही हरकत उपस्थित न केल्यास अर्जदाराने अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्यांचे नांवे वारस दाखला येईल. येणेप्रमाणे जाहीर नोटीस देवून कळविले आहे.

अलिबाग
दिनांक : / /२०२५

सही/-
**कनिष्ठ लिपीक,**
**दि.न्या व स्तर**
**अलिबाग-रायगड**

सही/-
**अधिक्षक**
**दि.न्या व स्तर**
**अलिबाग-रायगड**

---

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड**
**अलिबाग यांचे कार्यालय**
**कॉंग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड**
**दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३** ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/गृह/मोफा क्र. ११/मा. अभि./जाहीर नोटीस/सन २०२५ — दिनांक :- ३०/१०/२०२५

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस

अर्जदार संस्था संतकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., मौजे धामोते, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड यांनी जगन्नाथ धोंडू जाधव(मयत) तर्फे वारस १) रमेश जगन्नाथ जाधव, २) निशिकांत जगन्नाथ जाधव, ३) यमुना जगन्नाथ जाधव, ४) विजया जगन्नाथ जाधव, ५) वंदना राजेंद्र जाधव, ६) परिमल राजेंद्र जाधव, ७) जितेन राजेंद्र जाधव, ८) रुणाली रमाकांत कार्लेकर, ९) प्रांजली प्रमोद दळवी, रा. रूम नं. १५, चौथा मजला, रुपश्री बिल्डींग, डॉ. मन्सूर रोड, तलावपाली, गडकरी, रंगायतन समोर, ठाणे पश्चिम-४००६०२ यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

गाव धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग - ११६/१, क्षेत्र ५५३ चौ.मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतिम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक १३/११/२०२५ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक ३०/१०/२०२५

सही/-
**काशिनाथ जगताप**
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड-अलिबाग

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मोजे शेडसई, ता. रोहा, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकत मिळकतीचे मालक रविंद्र यशवंत मेहेंदळे यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| शेडसई<br>ता.रोहा | ३९० | वरकस २-४७-००<br>पो.ख. क्षेत्र ०-१६-००<br>एकुण क्षेत्र २-६३-०० | १.८७ |
| शेडसई<br>ता.रोहा | ४०५ | वरकस ३-१२-००<br>पो.ख. क्षेत्र ०-७२-००<br>एकुण क्षेत्र ३-८४-०० | २.१२ |

वर वर्णन केलेल्या भुमापन क्र. ३९० या जमिन मिळकती पैकी रवींद्र यशवंत मेहंदळे यांचे नावे असलेले ०-४०-०० हे. आर. क्षेत्र आणि भुमापन क्र.४०५ पैकी दिनांक १२/०६/२०१९ रोजीचे खरेदीखत दस्त क्र. १२५४/२०१९ अन्वये विक्री केल्या नंतर उर्वरीत राहिलेले ०-२४-०० हे. आर. क्षेत्र सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत रविंद्र यशवंत मेहेंदळे यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष तावेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक - ०३/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरुमखाण पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड,

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे शेडसई, ता. रोहा, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| शेडसई<br>ता.रोहा | ४०६ | वरकस ०-४०-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५०-०० | ०.२७ |
| | ४०७ | वरकस ०-४०-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५०-०० | ०.२७ |
| | ४१० | वरकस ०-४०-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५०-०० | ०.२७ |
| | ४११ | वरकस ०-४०-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५०-०० | ०.२७ |
| | ४१२ | वरकस ०-४१-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५१-०० | ०.२८ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकती ह्या विद्यमान मालक श्रीमती निलीमा सुनील दाणी यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण-अलिबाग
दिनांक ०३/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड,

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे शेडसई, ता. रोहा, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकत मिळकतीचे मालक रविंद्र कुमार गोयल यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| शेडसई<br>ता.रोहा | ४०५ | वरकस ३-१२-००<br>पो.ख. क्षेत्र ०-७२-००<br>एकुण क्षेत्र ३-८४-०० | २.१२ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती पैकी रवींद्र यशवंत मेहेंदळे यांचेकडुन दिनांक १२/०६/२०१९ रोजीचे खरेदीखत दस्त क्र.१२५४/२०१९ अन्वये खरेदी केलेले ०-८०-०० हे. आर. क्षेत्र सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत रविंद्र कुमार गोयल यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष तावेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५(पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक ०३/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरुमखाण पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड,

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे शेडसई, ता. रोहा, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| शेडसई<br>ता.रोहा | ३९५ | जिरायत ११-८६-५०<br>पो.ख. क्षेत्र ३-३४-५०<br>एकुण क्षेत्र १५-२१-०० | ७.५९ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती पैकी २-००-०० हे. आर. क्षेत्र सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्रीमती मंदा सुधीर पोकळे यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकत हि विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक - ०३/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरुमखाण पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड,

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे शेडसई, ता. रोहा, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| शेडसई<br>ता. रोहा | ४१५ | वरकस ०-४१-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५१-००<br>पैकी क्षेत्र ०.११.०० | ०.२८ |
| | ४१६ | वरकस ०-४१-३०<br>पो.ख.क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५१-००<br>पैकी क्षेत्र ०-११-०० | ०.२८ |
| | ४१७ | वरकस ०-४१-३०<br>पो.ख.क्षेत्र ०-०९-७०<br>एकूण क्षेत्र ०-५१-००<br>पैकी क्षेत्र ०-११-०० | ०.२८ |
| | ४१८ | वरकस ०-४१-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५१-००<br>पैकी क्षेत्र ०-११-०० | ०.२८ |
| | ४१९ | वरकस ०-४१-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५१-००<br>पैकी क्षेत्र ०-११-०० | ०.२८ |
| | ४२३ | वरकस ०-४१-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५१-००<br>पैकी क्षेत्र ०-११-०० | ०.२८ |
| | ४२४ | वरकस ०-४१-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र०-५१-००<br>पैकी क्षेत्र ०-११-०० | ०.२८ |
| | ४२५ | वरकस ०-४९-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५१ ००<br>पैकी क्षेत्र ०-११-०० | ०.२८ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकती ह्या विद्यमान मालक श्री. तुकाराम सिताराम डवले यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष तावेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, तावा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्बंध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक ०३/१२/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड,

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे शेडसई, ता. रोहा, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| शेडसई<br>ता.रोहा | ३९५ | जिरायत ११-८६-५०<br>पो.ख. क्षेत्र ३-३४-५०<br>एकुण क्षेत्र १५-२१-०० | ७.५९ |

**वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती पैकी ०-६०-०० हे. आर. क्षेत्र सदर नोटीसीचा विषय आहे.**

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्री. राहुल रमेश ठोंबरे यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष तावेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, तावा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकत हि विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक ०३/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड,

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मोजे शेडसई, ता. रोहा, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| शेडसई<br>ता.रोहा | ३९५ | जिरायत ११-८६-५०<br>पो.ख. क्षेत्र ३-३४-५०<br>एकुण क्षेत्र १५-२१-०० | ७.५९ |

**वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती पैकी १-०१-०० हे. आर. क्षेत्र सदर नोटीसीचा विषय आहे.**

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्री. जयेश विजय सावंत आणि पराग प्रकाश पात्रीकर यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष तावेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकत हि विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक : ०३/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरुमखाण पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड,

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे शेडसई, ता. रोहा, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| शेडसई<br>ता.रोहा | ३९० | वरकस २-४७-००<br>पो.ख. क्षेत्र ०-१६-००<br>एकुण क्षेत्र २-६३-००<br>पैकी २-२३-०० हे. आर. | १.८७ |
| | ४०८ | वरकस ०-४०-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५०-०० | ०.२७ |
| | ४०९ | वरकस ०-४०-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५०-०० | ०.२७ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकती ह्या विद्यमान मालक श्री. पुनित सतिश वाधवा यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबातचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक ०३/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण पो. वरसोली
ता.अलिबाग, जि. रायगड,

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे शेडसई, ता. रोहा, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकती मिळकतीचे मालक कै.गौरी त्रिंबक केळकर यांचे कायदेशीर वारस कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| शेडसई<br>ता.रोहा | ४१३ | वरकस ०-४१-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५१-०० | ०.२८ |
| | ४१४ | वरकस ०-४१-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५१-०० | ०.२८ |
| | ४२१ | वरकस ०-४१-३०<br>पो.ख. क्षेत्र ०-०९-७०<br>एकुण क्षेत्र ०-५१-०० | ०.२८ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकती ह्या कै. गौरी त्रिंबक केळकर मयत तर्फे वारस श्री. त्रिंबक दत्तात्रेय केळकर, निलकंठ त्रिंबक केळकर आणि उत्तरा त्रिंबक केळकर (मा.दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर खालापुर यांचेकडील दिवाणी चौकशी अर्ज क्र. ११८/२०२२ अन्वये वारस) यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती ह्या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक- ०३/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड,

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे शेडसई, ता. रोहा, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| शेडसई<br>ता.रोहा | ३९५ | जिरायत ११-८६-५०<br>पो.ख. क्षेत्र ३-३४-५०<br>एकुण क्षेत्र १५-२१-०० | ७.५९ |

**वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती पैकी २-००-०० हे.आर. क्षेत्र सदर नोटीसीचा विषय आहे.**

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्री. राहुल जगन्नाथ हेडगे यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकत हि विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक- ०३/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण पो. वरसोली
ता.अलिबाग, जि.रायगड,

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# भारताच्या लेकींचा विश्वविजय



















**विनायक दळवी**

## खडतर प्रवासानंतर महिला क्रिकेटपटूंच्या वाट्याला विश्वविजेतेपदाचा आनंद

नवी मुंबईच्या डी. वाय. पाटील स्टेडियमवरील विजेतेपदाचा आयसीसी विश्वचषक उंचावताना, प्रत्येक महिला क्रिकेटपटूच्या मनात त्या क्षणापर्यंतचा संघर्ष आणि अनुभवलेल्या कटू क्षणांचा जीवनपटच उलगडत होता. प्रशिक्षक अमोल मुजुमदार वारंवार एकच गोष्ट सांगत होता. या संघातील प्रत्येक खेळाडूने घेतलेली मेहनत आणि दाखवलेले जिद्द, चिकाटी यामुळेच स्पर्धेच्या सलग तीन पराभवानंतरच्या प्रवासापासूनचा एक चित्त थरारक अनुभव.

सलामीची फलंदाज प्रतिका रावल हिचा बांगलादेश विरुद्ध सामन्यात क्षेत्ररक्षण करताना दुखावलेला पाय. पायापेक्षा मनावरच अधिक वेदना करणार होता. अवघ्या २३ सामन्यात १००० धावांची वेस ओलांडून जागतिक फलंदाजांमध्ये अग्रेसर असलेल्या प्रतिका तिच्याकडून भारताच्या बाद फेरीतील यशाच्या अशा अवलंबून होत्या. परंतु तिचा पाय जायबंदी झाला आणि भारताच्या आशादेखील जवळजवळ संपुष्टात आल्या होत्या. त्या क्षणापासून, गेला आठवडाभर, व्हीलचेअरवर बसून ती आपल्या मनातल्या वेदना दूर करण्यासाठी अंतिम फेरीतील यशाच्या क्षणाची वाट पाहत होती. भारताने विश्वचषक जिंकला आणि तिच्या चेहऱ्यावरील त्या वेदना गायब झाल्या. डायना एडूलजीपासून मिताली राजपर्यंत आणि सध्याच्या महिला क्रिकेटपटू शेफाली वर्मा, हरमनप्रीत कौरपासून मंधानापर्यंत प्रत्येकीने अशा वेदना अनुभवल्या आहेत आणि संघर्ष करत करत जिद्दीचा त्यांचा प्रवास रविवारी डी. वाय. पाटील स्टेडियमवरील विजेतेपदाच्या ट्रॉफीपर्यंत येऊन विसावला. आठवड्यापूर्वी प्रतिका रावल हिला जसं भविष्यात काय लिहिलं हे ठाऊक नव्हतं तसंच शेफाली वर्मालादेखील जाणीव नव्हती. हरियाणा संघाबरोबर ती गेल्या आठवड्यात सुरत येथे होती. एका आठवड्यात तिने स्वतःच आणि भारतीय संघाचा नशीबदेखील पालटलं. अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिका विजयाकडे आगे कूच करत असताना कप्तान हरमनप्रीत कौरने चेंडू शेफालीच्या हाती दिला. सलग दोन षटकात दक्षिण आफ्रिका संघाची कप्तान आणि शतकवीर हिच्यासह तिच्या जोडीदाराला बाद केलं आणि सामना भारताच्या बाजूला झुकला. त्याआधी सलामीला येताना ७८ चेंडू ८७ धावा फटकावून अंतिम सामन्यात भारतीय संघाला विजयी धावसंख्येचा पाया रचून दिला होता. त्याआधी ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य संघाला उपांत्य फेरीत हरवताना शतक झळकावणारी जेमिमा रॉड्रिग्ज हिचा संघर्ष त्यापेक्षा कठोर होता. जेमिमा रॉड्रिग्जला बार्बी डॉल नाही तर लहानपणी बॅट आवडायची. 'तू क्रिकेट खेळणार, की हॉकी?' जेमिमा रॉड्रिग्ज जेमतेम अकरा वर्षांची असताना तिच्या वडिलांनी हा प्रश्न विचारला होता, तेव्हा तिच्या डोळ्यातून घळाघळा पाणी वाहू लागलं.

दोन्ही खेळांत उत्तम कामगिरी करणाऱ्या जेमिमानं अखेर क्रिकेट निवडलं आणि चौदा वर्षांनंतर ती एका अविस्मरणीय विजयाची शिल्पकार ठरली. मुंबईच्या लोकलमध्ये धक्के खाण्यापासून ते संघातून वगळल्याचं दुःख सहन करण्यापर्यंत, जेमिमानं अनेक अडथळ्यांना तोंड दिलं आहे. खेळतानाच्या दुखापती त्यामुळे होणाऱ्या वेदना आणि त्यापेक्षाही मनावर होणारे मानसिक आघात या सर्व संकटांवर मात करत तिने भारताला विश्वचषक विजयापर्यंत पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. जवळजवळ प्रत्येक महिला क्रिकेटपटू असाच अनुभवांमधून गेली आहे. २००५ पासून भारतीय क्रिकेट मंडळाने महिला क्रिकेटला सामावून घेतलं आणि तेव्हापासून त्यांच्या दुःखाचा डोंगर काहीसा कमी व्हायला लागला. त्या आधीचा कालखंड तर फारच कठीण होता. महिला क्रिकेट संघ रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाच्या बोगीतून प्रवास करायचा कोणाचतरी मोठं घर किंवा शाळेचे पटांगण शाळेचा हॉल किंवा क्लासरूम यामध्ये त्यांची राहण्याची व्यवस्था व्हायची मला आठवते. एकदा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले होते की, त्यांच्या आई प्रमिलाताई महिला क्रिकेट संघाच्या त्या काळात अध्यक्ष होत्या. त्यामुळे डायना एडूलजी आणि त्यांच्या सहकारी दिल्लीला सामना असला की त्यांच्या घरीच यायच्या आणि मग पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर माळ्यावर ठेवलेले बेड्स व चादरी काढून हॉलमध्ये अंथरण्याची जबाबदारी असायची. अनेक ठिकाणी अशा कठीण परिस्थितीत सध्याच्या महिला खेळाडूंनी देखील वास्तव्य केले आहे. त्या संघर्षानंतरच त्यांचा आजवरचा त्यांचा विश्वविजेतेपर्यंतचा प्रवास सफल झाला आहे.

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय महिला संघाने रविवारी नवी मुंबईच्या डी वाय पाटील स्टेडियमवर इतिहास घडवला. दक्षिण आफ्रिकेवर ५२ धावांनी विजय मिळवून हरमनप्रीत कौरच्या संघाने वर्ल्ड कप विजयाचे स्वप्न पूर्ण केले. भारताच्या ७ बाद २९८ धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण संघ ४५.३ षटकांत २४६ धावांवर ऑल आऊट झाला. दीप्ती शर्मा व शफाली वर्मा यांच्या अष्टपैलू कामगिरीने भारतीय संघाने हा ऐतिहासिक विजय मिळवला. ८७ धावा आणि दोन महत्त्वपूर्ण विकेट घेणाऱ्या २१ वर्षीय शेफाली वर्मा हिला प्लेअर ऑफ द फायनल म्हणून गौरविण्यात आले.

डीवाय पाटील स्टेडियमवर झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने गोलंदाजीचा निर्णय घेतला. भारताने ७ बाद २९८ धावा केल्या. शेफालीने ८७, दीप्ती शर्माने ५८, स्मृती मंधाना ४५ आणि रिचा घोषने ३४ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून अयाबोंगा खाकाने तीन बळी घेतले.मोठ्या लक्ष्यासमोर असताना, दक्षिण आफ्रिकेचा संघ २४६ धावांवरच गारद झाला. कर्णधार लॉरा वोल्वार्ड्टने सलग दुसरे शतक झळकावले, परंतु संघाला विजयाकडे नेण्यापूर्वीच ती बाद झाली. भारताची अर्धवेळ ऑफ स्पिनर शेफाली वर्माने दोन विकेट घेत सामना फिरवला. दरम्यान, दीप्ती शर्माने पाच विकेट घेतल्या आणि संघाचा विजय निश्चित केला. दीप्तीला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले.

शफाली वर्मा ( ८७) व दीप्ती शर्मा (५८) यांच्या अर्धशतकाला स्मृती मानधना ( ४५) व रिचा घोष (३४) यांच्या खेळीची साथ मिळाली. भारतीय संघाने फायनलमध्ये ७ बाद २९८ धावा केल्या आणि वर्ल्ड कप स्पर्धेतील फायनलमधील ही दुसरी सर्वोत्तम खेळी ठरली.

दीप्ती शर्माने ५८ धावांनंतर गोलंदाजीत कमाल करताना ३९ धावांत ५ विकेट्स घेतल्या आणि वर्ल्ड कप फायनलमध्ये अर्धशतक व पाच विकेट्स घेणारी ती पहिली खेळाडू ठरली. पुरुष किंवा महिला वर्ल्ड कप स्पर्धेच्या बाद फेरीत अशी कामगिरी कुणालाच करता आली नव्हती. दीप्तीने या वर्ल्ड कप स्पर्धेत एकूण २२ विकेट्स घेतल्या आणि तिने १९८२ मध्ये जॅकी लॉर्डच्या २२ विकेट्सच्या विक्रमाशी बरोबरी केली. त्याच वर्ल्ड कपमध्ये लीन फुलस्टोनने २३ विकेट्स घेतल्या होत्या. पण, वर्ल्ड कपच्या एकाच पर्वात २२ विकेट्स व २१५ धावा करणारी दीप्ती ही पहिलीच खेळाडू ठरली आहे. २००५ आणि २०१७ आणि टी २० विश्वचषक २०२० मध्ये अधुरं राहिलेल स्वप्न हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघानं स्वप्ननगरीत साकार करून दाखवलं. भारतीय संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिका संघाची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्ड हिने शतकी खेळी केली. तिने भारतीय संघाचं टेन्शन वाढवलं होते. पण दीप्तीच्या गोलंदाजीवर तिने मोठा फटका खेळला अन् अमनजोत कौरनं तिसऱ्या प्रयत्नात कॅच पूर्ण करत भारतीय महिला संघाचा तिसऱ्या प्रयत्नात ट्रॉफी जिंकण्याचा मार्ग मोकळा केला.

वर्ल्ड कप स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड महिला संघाशिवाय वर्ल्ड कपची फायनल रंगल्याचे पाहायला मिळाले. भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील फायनलसह २५ वर्षानंतर नवा वर्ल्ड चॅम्पियन मिळणार हे आधीच ठरलं होतं. अखेर तिसऱ्या प्रयत्नात भारतीय महिला संघाने वर्ल्ड कप ट्रॉफीचं स्वप्न साकार केले. २००० मध्ये न्यूझीलंडच्या संघानंतर आता ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यानंतर वनडे वर्ल्ड कप जिंकणारा भारत हा चौथा संघ ठरला आहे.

भारतीय महिला संघाने टॉस गमावल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकात २९८ धावा करत दक्षिण आफ्रिकेच्या संघासमोर २९९ धावांचे टार्गेट सेट केले होते.

या धावसंख्येचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्ड हिने सेमी फायनलनंतर फायनलमध्येही शतक करत वर्ल्ड रेकॉर्ड रचला. वर्ल्ड कपच्या एका हंगामात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम तिने आपल्या नावे केला. पण शेवटी भारतीय संघाने फायनल बाजी मारत अधुरं स्वप्न साकार केलं.

## महिला संघासह सपोर्ट स्टाफ होणार मालामाल

**मुंबई :** हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली टीम इंडियानं इतिहास घडवत महिला क्रिकेट वर्ल्ड कपवर नाव कोरलं. या विजयानंतर भारतीय संघावर बक्षीसाचा वर्षाव झाला. आयसीसीकडून वर्ल्ड कप विजेत्या संघाला ४.४८ मिलीयन अमेरिकन डॉलरचं बक्षीस दिलं जाणार आहे. भारतीय चलनानुसार हे बक्षीस ३९.७८ कोटी रुपये इतकं आहे. यानंतर आता बीसीसीआयनेसुद्धा अतिरिक्त बक्षीसाची घोषणा केली आहे.



बीसीसीआय सचिव देवजीत सैकिया यांनी आयसीसी महिला क्रिकेट वर्ल्ड कप जिंकणाऱ्या संघाला ५१ कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर केलंय. देवजीत सैकिया म्हणाले की, १९८३मध्ये कपिल देव यांनी भारताला वर्ल्ड कप जिंकवून देत क्रिकेटच्या नव्या युगाला सुरुवात केली. आज महिलांनीही तोच उत्साह निर्माण केला आहे. हरमनप्रीत कौर आणि तिच्या संघानं फक्त ट्रॉफी जिंकली नाही तर भारतीयांचं मनही जिंकलं. महिला क्रिकेटर्सच्या पुढच्या पिढीसाठी प्रशस्त असा मार्ग तयार केला. भारताने जेव्हा सेमीफायनलला ऑस्ट्रेलियाला हरवलं तेव्हाच महिला क्रिकेट पुढच्या पातळीवर पोहोचलं होतं.

जय शहा यांनी बीसीसीआयचा कार्यभार सांभाळल्यानंतर महिला क्रिकेटमध्ये अनेक बदल केले आहेत. वेतन समान करण्यावर भर दिला. गेल्या महिन्यात आयसीसीचे अध्यक्ष जय शहा यांनी महिलांच्या पुरस्काराच्या रकमेत ३०० टक्के वाढ केली. आधी पुरस्काराची रक्कम २.८८ मिलियन डॉलर होती. आता ती वाढवून १४ मिलियन डॉलर इतकी केली आहे. यामुळे महिला क्रिकेटला प्रोत्साहन मिळणार आहे. बीसीसीआयने महिला वर्ल्ड कप विजेत्या संघातील खेळाडू, प्रशिक्षक यांना ५१ कोटींच्या बक्षीसाची घोषणा केली.

## पाकिस्तानच्या खेळाडूंची स्तुतीसुमने

**लाहोर :** भारतीय महिला क्रिकेट संघाने पहिल्यांदाच विश्वचषक जिंकून इतिहास रचला. या शानदार विजयाच्या पार्श्वभूमीवर फक्त भारतातूनच नव्हे तर शेजारचा देश, पाकिस्तानमधूनही प्रतिक्रिया समोर आल्या आहेत.पाकिस्तानेच माजी खेळाडू आणि माजी कर्णधार रमीझ राजाचा एक व्हिडीओ समोर आला आहे. त्यांनी भारतीय संघावर स्तुतीसुमनं उधळली. ते इतके उत्तम संघ का आहेत हे भारताने पुन्हा एकदा दाखवून दिलं, त्यांचे संघटन भक्कम आहे. त्यांची कामगिरी भक्कम आहे. पाकिस्तानाचा माजी वेगवान गोलंदाज शोएब अख्तरनेही भाष्य केलं. भारताच्या विजयाबद्दल अभिनंदन. भारतीय मुलींनी चांगला खेळ केला आणि खरोखरच त्या विजयासाठी पात्र होत्या.

## प्रशिक्षक अमोल मुजुमदारांवर कौतुकाचा वर्षाव

**नवी मुंबई :** रविवारी २ ऑक्टोबर रोजी भारतीय महिला क्रिकेट संघाने पहिल्यांदाच विश्वचषक जिंकून इतिहास रचला आहे. दरम्यान, नेटकऱ्यांनी अमोल मुजूमदार यांचे देखील कौतुक केले आहे.

सोशल मीडियावर महिला क्रिकेटसंघ जिंकल्यानंतर वेगवेगळ्याच्या प्रतिक्रिया दिसत आहेत. काहींनी संघाचे कोच अमोल मुजूमदार यांचे कौतुक केले आहे. सोशल मीडियावर एका यूजरने अमोल मुजूमदार यांचा फोटो शेअर करत खाली चक दे इंडिया या सिनेमातील शाहरुख खानचा फोटो शेअर केला आहे. हा फोटो शेअर करत, क्रिकेटमध्ये आयुष्य वेचणारे, कधीही भारतीय कॅप न घालणारे, तरीही महिला विश्वचषक जिंकणारे प्रशिक्षक म्हणून उदयास आलेले अमोल मुझुमदार रणजीचे दिग्गज अमोल मुजूमदार या आशयाचे कॅप्शन दिले आहे.

अमोल मुजुमदार हे भारतीय क्रिकेटचे असे नाव आहे ज्याला या खेळाचा चाहता, प्रत्येक माणूस ओळखतो. रणजी क्रिकेटमध्ये धावांचा ढिग लावूनही ते कधीही आंतरराष्ट्रीय सामना खेळू शकले नाहीत. विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न त्यांना खेळाडू म्हणून पूर्ण करता आले नसले तरी कोच बनून त्यांनी जे केले त्याने इतिहासाच्या पानांत नाव कोरले. अमोलने आपली जिद्द महिला संघाला विश्वविजेते बनवून पूर्ण केली.



### रिअल लाइफचे कबीर खान

शाहरुख खानने चक दे इंडिया चित्रपटात अशा हॉकी खेळाडू कबीर खानची भूमिका साकारली होती जो आपल्या संघाला विश्वविजेते बनवू शकला नव्हता. तो या पराभवाच्या वेदनेसह जगत होता आणि महिला संघाचे कोच होण्याचा निर्णय घेतला. व्यवस्थापनाचा विश्वास मिळवला आणि संघाला विश्वविजेते बनवले. अमोलनेही महिला संघाचे कोच होऊन त्यांना विश्वविजेते बनवले.

पहिल्यांदाच महिला विश्वविजेते झाल्या आणि असे वाटले की शाहरुखच्या चक दे इंडियामध्ये पडद्यावर साकारलेल्या भूमिकेला अमोलने जिवंत करून दाखवले.

## मोदींपासून ते सचिन,विराट सर्वांनी केले अभिनंदन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

रविवारी मुंबईत झालेल्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघ पहिल्यांदाच विश्वविजेता बनला. संघाच्या या ऐतिहासिक विजयावर क्रिकेटपटू आणि सेलिब्रिटींच्या सोशल मीडियावरील प्रतिक्रियांनी लक्ष वेधले आहे.

**खेळाडूंचे अभिनंदन – पंतप्रधान मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर लिहिले की, आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ च्या अंतिम सामन्यात भारतीय संघाचा शानदार विजय. अंतिम सामन्यातील त्यांची कामगिरी अविश्वसनीय कौशल्य आणि आत्मविश्वासाने भरलेली होती. संपूर्ण स्पर्धेत संघाने असाधारण टीमवर्क आणि चिकाटी दाखवली. खेळाडूंचे अभिनंदन. हा ऐतिहासिक विजय भविष्यातील विजेत्यांना खेळात रस घेण्यास प्रेरणा देईल.

**मुलींनी भारताला अभिमानास्पद कामगिरी केली – राष्ट्रपती मुर्मू**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी लिहिले की, आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ जिंकल्याबद्दल भारतीय महिला क्रिकेट संघाच्या सर्व सदस्यांचे मनापासून अभिनंदन. त्यांनी पहिल्यांदाच जिंकून इतिहास रचला आहे. त्या चांगले खेळत आहेत आणि आज त्यांना त्यांच्या प्रतिभेच्या आणि कामगिरीच्या अनुरूप निकाल मिळाला आहे. हा निर्णायक क्षण महिला क्रिकेटला आणखी उंचीवर घेऊन जाईल. या मुलींनी भारताला ज्या पद्धतीने अभिमानास्पद कामगिरी केली आहे त्याचे मी कौतुक करते.

**विराट कोहलीने केले अभिनंदन**

विराट कोहलीने इंस्टाग्रामवर लिहिले, या मुलींनी इतिहास रचला आहे आणि एक भारतीय म्हणून, मला खूप अभिमान आहे की इतक्या वर्षांच्या कठोर परिश्रमाचे फळ मिळाले आहे. त्या सर्वांच्या कौतुकास पात्र आहेत आणि या ऐतिहासिक कामगिरीसाठी हरमनप्रीत आणि संपूर्ण संघाचे खूप खूप अभिनंदन. पडद्यामागील कामासाठी संपूर्ण संघ आणि व्यवस्थापनाचेही अभिनंदन. या क्षणाचा पुरेपूर आनंद घ्या. हे आपल्या देशातील असंख्य मुलींना खेळात रस घेण्यास प्रेरणा देईल. जय हिंद.

**भारतरत्न सचिन तेंडुलकरने ट्विट केले**

सचिन तेंडुलकरने वर लिहिले, १९८३ ने एका संपूर्ण पिढीला मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती स्वप्ने पूर्ण करण्याची प्रेरणा दिली. आज, आपल्या महिला क्रिकेट संघाने खरोखरच काहीतरी खास साध्य केले आहे. त्यांनी देशभरातील असंख्य तरुणींना बॅट आणि बॉल उचलण्याची, मैदानात उतरण्याची आणि त्या देखील एक दिवस ही ट्रॉफी उचलू शकतात असा विश्वास ठेवण्याची प्रेरणा दिली आहे. भारतीय महिला क्रिकेटच्या प्रवासातील हा एक निर्णायक क्षण आहे. शाब्बास, टीम इंडिया.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)